CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष – ३ रे | अंक ३०१ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## थोडक्यात...

### बन यांचे टिकास्त्र

**मुंबई :** देशाच्या इतिहासात प्रथमच लोकसभेमध्ये पंतप्रधानांना भाषण देता येईल असे सुरक्षित वातावरण नव्हते ही दुर्दैवाची बाब आहे. या घटनेचा भारतीय जनता पार्टी धिक्कार करते. संसदेमध्ये लोकशाही मार्गाने आंदोलन न करता काँग्रेसच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आसनासमोर येऊन त्यांच्या जीवाला धोका उत्पन्न होईल असे वर्तन करत आंदोलन केले. संसदेच्या समृद्ध परंपरेला आणि इतिहासाला काळीमा फासणा–या काँग्रेस खासदारांच्या या वर्तनाचे समर्थन उबाठा गट आणि संजय राऊत करत आहेत हे अत्यंत चीड आणणारे आहे असे शरसंधान भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन साधले.

### तरुणाने गमावला डोळा

**मुंबई :** मुंबईची लोकल ही मुंबईची लाईफलाईन आहे. मुंबईची शान आहे, पण याच रेल्वेवर हल्ली प्रवाशांचा ताण वाढत चालला आहे. लोकलमध्ये गर्दी इतकी असते अनेकवेळा प्रवाशांची भांडणं आणि गर्दीमुळे रागाच्या भरात प्रवाशांकडून गुन्हे देखील घडत आहेत. काही दिवसांपूर्वीच मालाडमध्ये झालेल्या भांडणात एकाने दुसऱ्याला भोसकले होते. त्यानंतर असाच एक धक्कादायक प्रकार बांद्रे स्थानकावर घडला आहे. दोन प्रवाशांच्या वादात एका अज्ञात इसमाने फेकलेला दगड एका तरुणाला लागला असून प्रवाशाचा डोळा कायमचा निकामी झाला आहे.

### बेकरीच्या मालकाची आत्महत्या

**सोलापूर:** सोलापुरात एकेकाळी अत्यंत प्रसिद्ध असलेल्या मुलतानी बेकरीचे मालक सुनील मोतीलाल सदारंगानी यांनी अपार्टमेंटच्या १७ व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. सोलापूर शहरातील विजयपूर रोडवरील पनाश अपार्टमेंटमध्ये गुरुवारी दुपारी एक वाजता ही घटना घडली आहे. या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यांना दोन मुले असून, एक मुलगा अमेरिकेत तर दुसरा पुण्यात व्यवसाय करतो. घटनेची माहिती मिळताच अमेरिकेत असलेला मुलगा सोलापूरकडे रवाना झाला आहे. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

### भोकरदानामध्ये काळी जादू ?

**जालना:** जालना जिल्ह्यातील एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. भोकरदन तालुक्यामध्ये एका अज्ञात महिलेने हॉटेलसमोर उघडपणे कथित स्वरुपात काळी जादू केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेचं सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आहे. हा संपूर्ण प्रकार जावखेडा ठोंबरे गावातील 'शिवनेरी हॉटेल' येथे घडला आहे. या सीसीटीव्ही फुटेजमध्ये चेहरा झाकलेली एक महिला दिसत आहे. घटनास्थळी हळद, कुंकू, लिंबू, बाहुली तसेच काही संशयास्पद साहित्य आढळून आलं आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गावातील प्रतिष्ठित नागरिकांची तसेच काही पोलीस कर्मचाऱ्यांची नावं लिहिलेल्या अनेक चिठ्ठ्याही सापडल्या आहेत.

### टुरिझम नेटवर्किंगचे आयोजन

**मुंबई :** श्रीलंका टुरिजम प्रमोशन ब्युरोने मुंबईमध्ये श्रीलंका टुरिजम नेटवर्किंग इव्हिनिंगचे आयोजन केले होते. श्रीलंका आणि भारत यांच्या दरम्यान पर्यटन, व्यापार आणि सांस्कृतिक संबंध मजबूत करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमामध्ये श्रीलंकेच्या प्रवास आणि पर्यटन उद्योगाच्या सदस्यांबरोबरीने भारतातील प्रमुख टूर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजंट्स, बैठका, प्रोत्साहन कार्यक्रम, परिषदा आणि प्रदर्शने (माईस) प्लॅनर्स, कॉर्पोरेट्स, एयरलाईन्स आणि प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. हा उपक्रम दोन्ही देशांच्या व्यापारी समुदायांदरम्यान संवाद, सहयोग आणि व्यावसायिक विकासाचा एक मजबूत पूल बनला. पर्यटन, व्यापार आणि डेस्टिनेशन वेडिंगसाठी श्रीलंकेची वाढती लोकप्रियता यावेळी ठळकपणे प्रदर्शित केली गेली.

# अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण थांबवा

## मुख्यमंत्र्यांनी सत्ताधारी आणि विरोधकांना सुनावले





**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ६ फेब्रुवारी : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघाती निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय आरोप–प्रत्यारोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, याबाबत सुरू असलेले राजकारण तात्काळ थांबवावे, असा इशारा त्यांनी दिला आहे. हा वाद निरर्थक, चुकीचा आणि खालच्या पातळीचा असल्याचे सांगत, सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंना त्यांनी खडेबोल सुनावले.**

अजित पवार यांच्या निधनानंतर काही घटकांकडून विविध तर्कवितर्क मांडले जात असून, या दुःखद घटनेतून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. जनतेत लोकप्रिय असलेले आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे राजकारण करणे अत्यंत चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक जण या घटनेला स्वतःच्या राजकीय चष्म्यातून पाहण्याचा प्रयत्न करत असून, ही मानसिकता धोकादायक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला होता. या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याने नव्या चर्चांना तोंड फुटले. मात्र, या सर्व घडामोडींना अनावश्यक राजकीय रंग देणे अयोग्य असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. अशा दुःखद प्रसंगी संयम राखणे, संवेदनशीलता दाखवणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे हीच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

# सिक्कीममध्ये जाणवले भूकंपाचे १३ धक्के

**सिक्कीम/वृत्तसंस्था:**

सिक्कीमच्या काही भागात चक्क १३ भूकंपाचे धक्के जाणवले. गुरुवारी रात्री उशिरा ते शुक्रवार सकाळपर्यंत हे धक्के जाणवले. राज्यातील सहा जिल्ह्यांपैकी चार जिल्ह्यांमध्ये या भूकंपाची नोंद झाली आहे. मंगन, नामची, गंगटोक आणि गेजिंग या जिल्ह्यांमध्ये हे धक्के जाणवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार या भूकंपांची तीव्रता रिश्टर स्केलवर २.२ ते ४.५ पर्यंत होती.

या भूकंपामुळे लोक भीतीने घराबाहेर पडले आणि परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अनेक रहिवासी काही मिनिटे घरा बाहेरच थांबले. त्यांना भूकंपाच्या संभाव्य धक्क्यांची भीती वाटत होती.

भारत सरकारच्या भूगर्भ विज्ञान मंत्रालयाच्या राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या आकडेवारीनुसार, नामची जिल्ह्यात चार आणि गंगटोक आणि गेजिंग जिल्ह्यात प्रत्येकी एक भूकंप जाणवला. गुरुवारी रात्री १:०९ वाजता गेझिंग जिल्ह्यात भूकंपाचा पहिला धक्का जाणवला, तर शुक्रवारी पहाटे ५:२९ वाजता नामची जिल्ह्यात शेवटचा धक्का जाणवला.

तर गेझिंग जिल्ह्यात पहाटे १:०९ वाजता पहिला धक्का जाणवला, ज्याची तीव्रता रिश्टर



स्केलवर ४.५ इतकी नोंदवली गेली. त्यानंतर, गंगटोक जिल्ह्यात दुपारी १:१५ वाजता ३.१ तीव्रतेचे, मंगन जिल्ह्यात दुपारी १:२३ वाजता २.२ तीव्रतेचे, मंगन जिल्ह्यात दुपारी २:०३ वाजता २.५ तीव्रतेचे, नामची जिल्ह्यात दुपारी २:२० वाजता ३.९ तीव्रतेचे आणि नामची जिल्ह्यात दुपारी २:४३ वाजता २.४ तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले.

त्याच क्रमाने, मंगन जिल्ह्यात दुपारी २:५६ वाजता २.४ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी २:५९ वाजता २.५ रिश्टर स्केलचा भूकंप, नामची जिल्ह्यात दुपारी ३:११ वाजता ४.० रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ३:३६ वाजता २.८ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ३:५२ वाजता २.७ रिश्टर स्केलचा भूकंप, मंगन जिल्ह्यात दुपारी ४:५७ वाजता २.२ रिश्टर स्केलचा भूकंप आणि अखेर नामची जिल्ह्यात सायंकाळी ५:२९ वाजता २.९ रिश्टर स्केलचा भूकंप जाणवला.

# मशिदीत नमाज सुरु असताना स्फोट, १२ ठार

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था:**

पाकिस्तानची राजधानी असलेल्या इस्लामाबादमधील एका इमामबारगाहमध्ये भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण गंभीर जखमी झाले आहेत. या परिस्थितीच्या पार्श्र्वभूमीवर इस्लामाबादमध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इस्लामाबादमधील एका शिया मशिदीत हा आत्मघातकी हल्ला झाला आहे. आत्मघातकी हल्लेखोराने आत प्रवेश केल्यानंतर गेटजवळ स्वतःला उडवून दिले. यामध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे आणि चार जण जखमी झाले आहेत. तर मीडिया रिपोर्ट्सनुसार आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाला आहे. स्फोटाचे वृत्त मिळताच पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आणि प्राथमिक बचाव कार्य सुरू झाले आहे.




स्फोटानंतर, इस्लामाबादमधील पॉलीक्लिनिक, पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (पीआयएमएस) आणि सीडीए हॉस्पिटलमध्ये आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. रुग्णालयाच्या प्रवक्त्याने दिलेल्या माहितीनुसार; पिआयएमएसच्या कार्यकारी संचालक (ईडी) यांच्या सूचनेनुसार रुग्णालयात आणीबाणी लागू करण्यात आली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्य आपत्कालीन, ऑर्थोपेडिक, बर्न सेंटर आणि न्यूरोलॉजी विभाग सक्रिय करण्यात आले आहेत. जखमींना पिआयएमएस आणि पॉलीक्लिनिकमध्ये दाखल करण्यात येत आहे.

## 'महिंद्रा'ची १५ हजार कोटींची गुंतवणूक

Mahindra

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. ६ फेब्रुवारी :** विदर्भाला औद्योगिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या राज्य सरकारच्या प्रयत्नांबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडच्या १५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे स्वागत केले. 'ॲडव्हांटेज विदर्भ' कार्यक्रमात या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची घोषणा करण्यात आली असून, नागपूरमध्ये १ हजार ५०० एकर क्षेत्रावर देशातील सर्वात मोठा एकात्मिक वाहन आणि ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्प उभारला जाणार आहे. तसेच, संभाजीनगर येथे १५० एकरांवर सप्लायर पार्क विकसित करण्यात येणार आहे. हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर दरवर्षी ५ लाखांहून अधिक वाहनांचे आणि १ लाख ट्रॅक्टरचे उत्पादन होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. या गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि प्रादेशिक विकासाला गती मिळेल तसेच वाहनउद्योग, शेती उपकरणे, तंत्रज्ञान आणि सप्लाय चेन क्षेत्राला चालना मिळेल. महाराष्ट्राला उत्पादन क्षेत्रात अग्रस्थानावर नेण्याच्या दृष्टीने ही गुंतवणूक महत्त्वाची ठरणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# अमेरिकेकडून सर्वात धोकादायक गुन्हेगारांची लिस्ट जारी

## ८९ भारतीयांची नावे, US गृह मंत्रालयाकडून खुलासा

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिकेकडून सर्वात धोकादायक गुन्हेगारांची यादी जाहीर करण्यात आली आहेत. त्यामध्ये ८९ भारतीयांची नावे आहेत. अमेरिकेच्या गृह मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या डेटाबेसमध्ये असंख्य गुन्हेगारांची नावे, फोटो आहेत.

अमेरिकेच्या डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीने ( DHS ) जारी केलेल्या डेटाबेसमध्ये हजारो गुन्हेगार बेकायदेशीर परदेशी लोंकाची यादी जारी केली आहे. ज्यात खूनी, लैंगिक गुन्हेगार, मनी लाँडरिंग, दरोडा, अपहरण आणि ड्रग्ज तस्करी करणारे यांचा समावेश आहे. या यादीत ८९ भारतीय वंशाच्या व्यक्तींचीही नावे समाविष्ट आहे.

**डेटाबेसमध्ये नावे, फोटो, गुन्हे**

गुन्हेगारांना यूएस इमिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंट आणि यूएस कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शनने अटक करून दोषी ठरवण्यात आले आहे. सार्वजनिक केलेल्या डेटाबेसमध्ये दोषी ठरलेल्यांची नावे, फोटो, गुन्हे आणि राष्ट्रीयत्व समावेश आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इमिग्रेशन कारवाईअंतर्गत अटक करण्यात आली आहे.DHS ने सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, या वेबसाइट च्या द्वारे अमेरिकेत कोणते गुन्हेगार बेकायदेशीरपणे राहत होते. त्यांना कोणत्या गुन्ह्या अंतर्गत अटक करण्यात आली हे सर्वसामान्य लोक पाहू शकतात. DHS ने म्हटले की, ट्रम्प प्रशासनाच्या काळातील ही कारवाईची छोटेसे उदाहरण आहे. हे तेच गुन्हेगार आहेत. ज्यांनी आपल्या समाजात दहशत निर्माण केली. आम्ही तोपर्यंत कारवाई थांबवणार नाही जोपर्यंत देशातील प्रत्येक गुन्हेगाराला काढून टाकले जात नाही. ज्यांना अमेरिकेत राहण्याचा कायदेशीर अधिकार नाही. अशा गुन्हेगारांकडून अमेरिकेच्या नागरिकांनी बळी पडू नये.

# आता स्वस्तात करा टॅक्सीने प्रवास! 'भारत टॅक्सी' अखेर सेवेत


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** स्वस्त आणि परवडणाऱ्या दरात टॅक्सी सेवा देणाऱ्या 'भारत टॅक्सी' या देशातील पहिल्या सहकार तत्त्वावरील टॅक्सी सेवेचे केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते गुरुवारी उद्घाटन झाले. ही सेवा सुरुवातीला दिल्लीतील राष्ट्रीय राजधानी परिसर (एनसीआर) आणि गुजरातमध्ये उपलब्ध असेल. देशभरातील एक हजार टॅक्सी चालक या कार्यक्रमाला उपस्थित होते. गेल्या दोन महिन्यांपासून प्रायोगिक तत्त्वावर सुरू होती. या काळात मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर आता अधिकृतपणे तिचे उद्घाटन करण्यात आले आहे. येत्या तीन वर्षांत ही टॅक्सी सेवा देशभरात सुरू करण्याचे नियोजन आहे.

**देशभरात कधी होणार सुरू?**

'भारत टॅक्सी' ही एक अनोखी टॅक्सी सेवा आहे. ही सेवा सहकार तत्त्वावर चालवली जाते, म्हणजेच टॅक्सी चालक स्वतःच या सेवेचे मालक असतील. यामुळे प्रवाशांना स्वस्त आणि किफायतशीर दरात प्रवास करता येईल. केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी या सेवेचे कौतुक केले आणि सांगितले की, तीन वर्षांत ही टॅक्सीसेवा देशभरात सुरू केली जाईल.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'भारत टॅक्सी' या नवीन टॅक्सी सेवेची घोषणा केली आहे. ही सेवा सहकारी तत्त्वावर चालणार असून, टॅक्सी चालकच या सेवेचे मालक असतील. अमूल समूहासह सहकार क्षेत्रातील आठ संस्थांनी मिळून ही सेवा सुरू केली आहे. या सेवेचे वैशिष्ट्य म्हणजे शून्य उत्सर्जन आणि किफायतशीर भाडे. 'भारत टॅक्सी' ही ओला, उबर आणि रॅपिडो यांसारख्या कंपन्यांशी स्पर्धा करेल.

अमित शहा यांनी सांगितले की, 'भारत टॅक्सी' सेवेची नोंदणी ६ जून २०२५ रोजी बहुराज्य सहकारी संस्था कायदा, २००२ अंतर्गत करण्यात आली आहे. या सेवेमुळे टॅक्सी चालकांना मोठा फायदा होणार आहे. ते म्हणाले, 'तुम्हीच या टॅक्सीसेवेचे चालक आणि मालक असाल.' ही सेवा लवकरच देशभरात सुरू होईल.



लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिक्षण व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन : ॲड.पाठक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना केवळ गुण मिळविण्यापुरते मर्यादित न राहता शिक्षणाचा खरा हेतू समजून घेतला पाहिजे. शिक्षण हे व्यक्तीमत्व विकासाचे प्रभावी साधन आहे. योग्य संस्कार, जीवनमूल्ये, सकारात्मक दृष्टीकोन यांच्या आधारेच उज्ज्वल भविष्य घडते. प्रत्येक विद्यार्थी हा स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार आहे, असा विश्र्वास आनंद मानसिक व अध्यात्मिक सल्ला केंद्राचे संचालक ॲड. नंदकिशोर पाठक यांनी व्यक्त केला.

लातूरच्या दत्तनगरातील श्री सदानंद माध्यमिक विद्यालयात आयोजित अधिव्याख्यानात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. डॉ. आर. के कुलकर्णी होते. यावेळी मुख्याध्यापक सतीश हलगरकर, पर्यवेक्षक खुंटेगावे, ज्येष्ठ शिक्षक पांचाळ यांच्यासह शिक्षकवृंदांची प्रमुख उपस्थिती होती. ॲड. पाठक पुढे म्हणाले, सद्गुरू वामनराव पै यांनी दिलेली जीवनमूल्ये, तत्त्वज्ञान व संस्कार विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतात. राष्ट्रप्रेम, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, चांगली संगत, व्यसनांपासून दूर राहणे, शारीरिक-मानसिक आरोग्याचे जतन आणि निसर्गनियमांचे पालन या गुणांचा अंगीकार केल्यास जीवन यशस्वी व समृद्ध होते, असे ते म्हणाले.



# विविध वृत्त...

### वाहनाच्या धडकेत पादचारी जखमी

**लातूर :** शहरातील गंजगोलाई परिसरात भरधाव रिक्षाने धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास फिर्यादी मोहम्मद रशीदसाब शेख हे गंजगोलाई परिसरातून जात असताना, आरोपी रिक्षाचालक (एम.एच. २४ ए.टी. ९५०२) याने आपली रिक्षा हयगयीने व वेगाने चालवून फिर्यादीला जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या उजव्या पायाला गंभीर इजा झाली आहे. पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पोलिस हवालदार नराळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### मतदानामुळे भरणारे आठवडी बाजार आज बंद राहणार

**लातूर :** लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समितीच्या निवडणुकीचे मतदान शनिवारी होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, तसेच मतदान शांततेत पार पडावे, यासाठी जिल्ह्यात ७ फेब्रुवारी रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत.

त्यानुसार लातूर तालुक्यातील कन्हेरी, औसा तालुक्यातील लिंबाळा दाऊ, अशित व किल्लारी, रेणापूर तालुक्यातील पानगाव, निलंगा तालुक्यातील अंबुलगा बु, चाकूर तालुक्यातील वडवळ ना. आणि जळकोट तालुक्यातील घोणसी येथील बाजार बंद राहणार आहेत. मतदानाला व्यत्यय नको म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

### दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**लातूर :** विवेकानंद चौक पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, नुकतीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातून एक मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी नामदेव श्रीरंग घोडके (रा. गरसुळी, ता. रेणापूर) यांची हीरो स्प्लेंडर (क्र. एमएच २२ एबी ६२९५) ही दुचाकी २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:३० ते दुपारी १:३० च्या दरम्यान मेडिकल कॉलेज परिसरातून अज्ञात चोरट्याने लंपास केली. या चोरीला गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे २०,००० रुपये आहे. याप्रकरणी ४ फेब्रुवारी रोजी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तपास पोलिस हवालदार यादव करत आहेत.

### जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**लातूर :** रोटरी क्लब लातूर व दयानंद कला महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोबाईल संस्कृती प्रगती की अधोगती या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते. कोव्हिड कालावधी पासून सबंध विद्यार्थी मोबाइलच्या आहारी गेलेले आहेत, यामुळे त्यांच्या शरीर शरीर व मनावर सखोल परिणाम होत चाललेला आहे. याचे गांभीर्य विचारात घेऊन हा विषय ठेवण्यात आला होता. सबंध जिल्हाभरातून ६१ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती.

### शहरात स्वच्छता मोहिमेची मागणी

**लातूर :** शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी लातूर महानगरपालिकेने तात्काळ विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अनेक प्रभागांमध्ये कचरा संकलन अनियमित, नाले तुंबलेले, तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे चित्र दिसून येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः वस्त्या, बाजारपेठा, बसस्थानक परिसर, रुग्णालयांच्या आसपासचे भाग आणि शाळा-महाविद्यालय परिसर येथे स्वच्छतेचा प्रश्र्न अधिक गंभीर बनला आहे.

### चाक निखळल्याने दोघे जण जखमी

**लातूर :** शहरातील बसवेश्वर चौक ते विवेकानंद चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर स्क्रैप चौकातील गतिरोधकाजवळ हायवाचे चाक निखळून स्कूटीवरील दोघे जण जखमी झाल्याची घटना रविवारी घडली. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात हायवा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महेश गणपती गिरी व त्याचा मित्र स्कूटीवरून जात असताना हायवा (एमएच २४, एयू ७२१९) चालकाने हयगयीने वाहन चालविण्याने चाक निखळून फिर्यादीचा पाय मोडला व त्याचा मित्रही जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास पोलिस हवालदार जी. एन. सरवदे करीत आहेत.

### प्रादेशिक परिवहन कार्यालयात अटकावून ठेवलेल्या वाहनांचा होणार लिलाव

**लातूर :** येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे मोटार वाहन कर जमीन महसूल आदी थकबाकीमुळे अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेची (वाहनांची) विक्री लिलाव प्रक्रियेद्वारे होणार आहे. हा लिलाव १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेदरम्यान ऑनलाइन पद्धतीने पार पडेल. लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहन धारकांना थकबाकी भरण्याची संधी दिल्यानंतरही वाहने सोडविली न गेल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. अटकावून ठेवलेल्या वाहनांची यादी, लिलावाच्या अटी व शर्ती तसेच इतर तपशील https://www.eauction.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी
# जागतिक शिक्षणाचे दरवाजे उघडणार !

- आदिवासी विकास विभागाकडून पात्र ४० तरुण-तरुणींना
- परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळणार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुलां-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी, त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे. या योजनेतंर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहे.



आदिवासी विकास विभागाकडून विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक, आकस्मिक, इतर खर्च, विमान प्रवास खर्च,व्हिसा शुलक आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे. शैक्षणिक, आकस्मिक, इतर खर्च युएएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १ हजार ५०० युएस डॉलर तर युकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल.

लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न ८ लाख रुपये तसेच विद्यापीठांची क्युस रँकिग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहीत निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल केली जाईल. तर क्युस वर्ल्ड रँकिग मर्यादा २०० पासून पुढे चढत्या क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. परदेशात उच्च शिक्षणासाठी आवश्यक टीओईएफएल किंवा आयईएलटीएस यासारख्या प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे विद्यार्थ्यांना अनिवार्य आहे.

शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी विहीत नमुन्यातील आवेदन https://fs.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर भरणे अनिवार्य आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारले जातील. निवड समितीद्वारे निकष पूर्ण करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांची निवड केली जाईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन आदिवासी विकास विभागाने केले. राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात पीएसडी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी दरवर्षी शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या परदेशातील उच्च शिक्षण घेण्याच्या इच्छूक आणि पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन आदिवासी विकास विभागचे आयुक्त लीना बनसोड यांनी केले आहे.

### योजनेचे निकष

विद्यार्थी अनुसूचित जमाती प्रवर्गातील आणि महाराष्ट्राचा रहिवासी असावा. पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे तर पीएचडी अभ्यासक्रमासाठी ४० वर्षे वयोमर्यादा निश्चित करण्यात आली. कुटूंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपर्यंत असावे. आवश्यक टीओईएफएल, आयईएलटीएस किंवा समकक्ष प्रवेश परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीमुळे मद्यविक्री राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६ कार्यक्रमानुसार ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान व ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. ही निवडणूक खुल्या, मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) अंतर्गत तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मतदानापूर्वीचा संपूर्ण दिवस म्हणजे ६ फेब्रुवारी २०२६, मतदानाचा संपूर्ण दिवस म्हणजे ७ फेब्रुवारी २०२६ रोजी महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत क्षेत्र वगळून संपूर्ण लातूर जिल्हा अबकारी अनुज्ञप्त्या (मद्य दुकाने) बंद राहतील.

याशिवाय, मतमोजणीच्या दिवशी म्हणजे ९ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, लातूर जिल्ह्यातील मतमोजणीचे ठिकाणी मद्यविक्री अनुज्ञप्त्याही बंद राहतील. एफएल-२, एफएलबीआर-२, एफएल-३, एफएल-४, एफएलबीआर-११ तसेच ताडी अनुज्ञप्ती इत्यादी सर्व प्रकारच्या मद्यविक्री अनुज्ञप्त्या या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी महाराष्ट्र मद्य निषेध कायदा १९४९ व महाराष्ट्र विदेशी मद्य नियम, १९६९ मधील तरतुदीनुसार निर्गमित केले आहेत. याबाबतची कार्यवाही संबंधित यंत्रणांना निर्देशित करण्यात आली आहे.

## लातूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** येथील श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक व महापूजा समाज बांधव श्री व सौ. कुमार अडाणे यांच्या यजमानपदाखाली पार पडली. त्यानंतर सकाळी ११ वाजता सराफ लाईन येथून भव्य मिरवणुकीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व नगरसेवक गणेश गवारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी मान्यवरांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.व ही मिरवणूक राजेश बागडे यांच्या दुकानासमोर स्वागत कार्यक्रमात माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

दुपारी किर्तन, त्यानंतर गुलाल व दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी मंदिर प्रभागाच्या नगरसेविका सौ. अदितीताई कव्हेकर तसेच ऋषिकेश राजे यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर महाप्रसादास सुरुवात करण्यात आली असून सुमारे ३००० ते ३२०० भाविक व समाज बांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष श्री. राजाभाऊ बोकन, पुण्यतिथी महोत्सव समितीचे कुमार अडाणे, नितीन बागडे, अजय भुमकर, रमेश अडाणे, शैलेश टेहरे, सुनील वाडकर, गजेंद्र बोकन ,बंडू शहाणे, सचिन अडाणे,सुजित बोकन, विलास भुमकर, अजय बोकन, गजानन उडानशीव, चंद्रकांतराव मुंडलिक, ओंकार डहाळे तसेच सर्व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनावर कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स येथील पीजी रिसर्च कमिटीच्या वतीने संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनावर या विषयावर एकदिवसीय सत्राचे आयोजन करण्यात आले. सदर सत्र दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सेमिनार हॉल येथे संपन्न झाले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर हे होते. तज्ज्ञ वक्ते म्हणून डॉ. सचिन प्रयाग, प्रभारी प्राचार्य, ब्रिलियंट कॉमर्स कॉलेज, लातूर यांनी संशोधन प्रकल्प लेखनातील विविध टप्पे, विषय निवड, उद्दिष्टे, गृहितके, साहित्य समीक्षा, संशोधन पद्धती, माहिती संकलन व विश्लेषण तसेच ओजेटी प्रकल्प अहवाल तयार करताना आवश्यक बाबींचे सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला विशेष उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. जी. आर. लहाने तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना व परिचय डॉ. बी. जी.कळंबे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुहाना शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. रूपा गिल्डा यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना संशोधन प्रकल्प व ओजेटी प्रकल्प लेखनाची योग्य दिशा मिळाली असून प्रकल्प अहवाल अधिक प्रभावीपणे तयार करण्यास मदत होणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सदर सत्राच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विशाल वर्मा, डॉ. अनुजा कांबळे, कु. साक्षी पाटील व कु. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमात त्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ४ महिन्यांपासून मानधन थकले
## स्वच्छ भारत मिशन कार्यालयाचे कामकाज ठप्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ६ फेब्रुवारी :**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर जवळपास २० वर्षांपासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे गेल्या ४ महिन्यापासनचे मानधन अद्याप थकले आहे. त्यामुळे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या उपजिविकेचा प्रश्र्न निर्माण झाला आहे. थकलेले मानधन मिळावे या बरोबरच इतर मागण्यासाठी स्वच्छ भारत मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बुधवार पासून कामबंद आंदोलन सुरू केल्याने लातूर जिल्हा परिषदेतील स्वच्छ भारत मिशन कार्यालयाचे कामकाज ठप्प झाले आहे. त्याचा परिणाम ग्रामीण भागात सुरू असलेल्या कामावर झाला आहे.

स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांनी प्रलंबीत वेतनाबरोबरच इतर मागण्यासाठी जिल्हा स्तरावर ४ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलन सुरू केले आहे. तसेच ९ फेब्रुवारी नंतर राज्यस्तरावर बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. हे आंदोलन मंत्री महोदयांच्या निवासस्थानासमोर सुरू होईल, त्यानंतर राज्य पाणी व स्वच्छता मिशन कार्यालय परिसरात आणि मुंबईतील आझाद मैदान येथे होणार आहे. यामुळे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत २०२६-२७ चा वार्षिक कृती आराखडा, क्षेत्रीय तपासणी, अहवाल सादरीकरण, ऑनलाईन नोंदी आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाजावर प्रतिकूल परिणाम होण्याची गंभीर शक्यता व्यक्त केली जात आहे. सनियंत्रण व मूल्यमापन तज्ज्ञ, माहिती शिक्षण व संवाद तज्ज्ञ, शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार, लेखाधिकारी, डाटा एन्ट्री ऑपरेटर या कंत्राटी पदावर कर्मचारी कार्यरत आहेत. जिल्हा व तालुका स्तरावर ग्रामपंचायतांमधील प्रत्यक्ष अंमलबजावणी, क्षेत्रीय तपासणी, लाभार्थी समन्वय, ऑनलाईन नोंदी आणि अहवाल सादरीकरण यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील नियोजन व देखरेखीची जबाबदारी पार पाडत आहेत.



स्वच्छ भारत मिशनचे कंत्राटी कर्मचारी बुधवार दि. ४ फेब्रुवारी पासून काम बंद आंदोलनात सहभागी झाल्याने सांडपाणी घन कचरा, वैयत्तीक शौचालय बांधकामांचा प्रोत्साहनपर लाभ देणे, सार्वजनीक स्वच्छता, घरांच्या मंजूरी देण्याचे कामकाजावर परिणाम झाला आहे. यंत्रणा ठप्प झाल्यामुळे याचा परिणाम स्वच्छ भारत मिशन ग्रामीण ग्रामीण भागातील कामकाजावर दिसून येणार आहे.

स्वच्छ भारत मिशनच्या कार्यालयातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन चार महिन्यांपासून प्रलंबित आहे. मानधन न मिळाल्याने कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. या कार्यालयाकडे पर्यायी यंत्रणा नसल्याने कामकाजावर परिणाम होणार होणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळवण्यात आले असल्याचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी मोहन अभंगे यांनी सांगीतले.

प्रशासनास लेखी निवेदन सादर करून सद्यस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती अवगत करून दिली आहे. ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या ४ महिण्याच्या कालावधीतील मानधन न मिळाल्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांच्या चा प्रश्र्न निर्माण झाला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मराठी भाषा ही समृध्द वारसा जतन करते : प्राचार्य डॉ. बबन पवार :

शारदा महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठी भाषेला समृद्ध असा वारसा लाभला असून भाषा ही समृद्ध वारसा जतन करते त्यामुळेच अभिजात मराठी भाषेचा दर्जा देऊन भाषेचा गौरवही करण्यात आला आहे, असे मत प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी व्यक्त केले.

येथील शारदा महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. नितीन बावळे, प्रा. सुनील बल्लाळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. संतोष नाकाडे उपस्थित होते. यावेळी बोलीच्या अनुषंगाने संत तुकाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी परळे यांनी बोलीभाषेच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने काव्यवाचन, कथाकथन व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विविध स्पर्धांचे परीक्षण करण्यासाठी परीक्षक म्हणून प्रा. डॉ. हनुमंत शेवाळे व प्रा. डॉ. रत्नाकर कांबळे उपस्थित होते.

यावेळी प्रा. डॉ. संतोष नाकाडे, डॉ. नितीन बावळे, डॉ. सुनील बल्लाळ व फायजा शेख यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कु. श्रद्धा अडने, कु. सानिका चव्हाण, कु. वैभवी साबळे यांनी कथाकथन केले तर कु. राधा साबळे, उज्वल भाग्यवंत, विनोद कराळे, संदीप दांडगे, ऋषिकेश मस्के, कु. सानिका चव्हाण, कु . राहत परवीन, कु. सानिका चव्हाण, गणेश घाडगे, कु. मुस्कान पठाण यांनी आपल्या स्वरचित कविता सादर केल्या. कु. श्रद्धा अडने या विद्यार्थिनीने आपली लोकसंस्कृती या विषयावर तर कु. सानिका चव्हाण हिने मराठी बोली भाषा या विषयावर भित्तीपत्रके रेखाटली, या भित्तीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सूत्रसंचालन कु. वैभवी साबळे, प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. उज्वला जगताप यांनी तर आभार प्रदर्शन कु. मुस्कान पठाण यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. सचिन खडके, कार्यालय प्रमुख सुरेश जयपूरकर, तनुजा रासवे, जावेद शेख, राजाराम मुत्रटकर यांनी प्रयत्न केले. ह्या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी आज मतदान

टपाली मतदान : मतदानाचा कार्यक्रम संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असलेल्या तसेच टपाली मतपत्रिकेसाठी अर्ज केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.टपाली मतदान प्रक्रिया ३ ते ६ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिंतूर येथील गुरु नथुराम महाराज केहाळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे राबविण्यात येणार आहे. निवडणूक कर्तव्यावर नियुक्त असून टपाली मतपत्रिकेची मागणी केलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठरवून दिलेल्या वेळेत व ठिकाणी उपस्थित राहून आपले मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश लाहोटी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती शीतल कच्छवे यांनी केले आहे.

### तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची भाजपा गटनेतेपदी अधिकृत निवड : विभागीय आयुक्त कार्यालयात निवड प्रक्रिया

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित नगरसेवकांच्या गटनेता पदासाठी आज सोमवार २ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात अधिकृतरित्या निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत सर्व नगरसेवकांच्या एकमताने श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांची भाजपा गटनेता म्हणून निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री सौ. मेघना बोर्डीकर, संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या सूचनेनुसार तसेच निवडणूक प्रमुख सुरेशराव वरपूडकर व रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड प्रक्रिया पूर्ण झाली. यापूर्वी २२ जानेवारी रोजी परभणी महानगर कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीचे अध्यक्षस्थान भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. शिवाजी भरोसे यांनी भूषविले. निवडीचा प्रस्ताव सूचक म्हणून डॉ. केदार लक्ष्मणराव खटिंग यांनी मांडला तर प्रस्तावास रितेश कांतीलाल झांबड (जैन) यांनी अनुमोदन दिले. या अधिकृत निवडीबद्दल सर्व नगरसेवकांनी श्रीमती तिरुमला मुकुंद खिल्लारे यांचे अभिनंदन केले. भाजपा नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली परभणी महानगरपालिकेत विकासाभिमुख व लोकहिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्यासह सौ. तिरुमला मुकुंद खिल्लारे, सौ. वैशाली दत्तात्रय दैठणकर, सौ. सपना व्यंकटेश जुकटे, विश्वजीत बुधवंत, गणेश टाक, रितेश जैन, सौ. गिरीजा शंकर आजेगावकर, सौ. मीना सुरेशराव वरपूडकर, सौ. निर्मला बालासाहेब वाघमारे, सौ. सुशीला जिजाजी थोरात, अद्वैत सांगळे तसेच डॉ. केदार खटिंग हे नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा**- तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पूर्णेतील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीसाठी आज होणार १३२ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया






**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी:** पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक साठी शनिवारी १४२ मतदान केंद्रात प्रत्यक्ष मतदान घेणार असून यासाठी सर्व प्रशासकीय यंत्रणा सज्ज करण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागाचे सहाय्यक निर्वाचन अधिकारी माधवराव बोथीकर यांनी सांगितले.

दरम्यान शुक्रवारी सर्व निवडणुकीचे साहित्य कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना करण्यात आले. पूर्णा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सहा गटासाठी व पंचायत समितीच्या बारा गणांच्या निवडणूक साठी शनिवारी सकाळी साडेसात ते साडेपाच या वेळेत प्रत्यक्ष मतदान घेतले जाणारे असून यासाठी शुक्रवारी पूर्णा तहसील कार्यातून निर्वाचन अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रतिभा गोरे सहाय्यक निर्वाचन अधिकारी माधवराव बोथीकर,नायब तहसीलदार पंढरीनाथ शिंदे, नायब तहसीलदार प्रशांत थारकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये निवडणुकीचे सर्व साहित्य व कर्मचारी त्यात्या मतदान केंद्रावर रवाना करण्यात आली असून शनिवारी सकाळी साडेसात ते साडेपाच यावेळी प्रत्यक्ष मतदान घेतले जाणार आहे या निवडणुकीसाठी एकूण एक लाख २२ हजार ६२७ मतदार आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत त्या निवडणुकीसाठी नागरिकांनी शासनाने घोषित केलेल्या सोळा ओळखपत्र पैकी एक ओळखपत्र मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी घेऊन जावे असे आवाहन निवडणूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच आहेरवाडी, माटेगाव, सुहागन,आव्हाई या चारही गावात नऊ सखी मतदान केंद्रावर सर्व महिला कर्मचारी रवाना करण्यात आले आहेत.

## रेल्वे महाव्यवस्थपकांना विविध मागण्यांचे निवेदन

**पूर्णा,/प्रतिनिधी:-** एम ४ दक्षिण मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजय श्रीवास्तव हे नांदेड डीव्हीजन च्या दौऱ्या साठी आले असता त्यांनी पूर्णा रेल्वे स्थानकास भेट दिली असता डॉ. बि.आर आंबेडकर प्रतिष्ठानच्या शिष्ट मंडळाने त्यांची भेट घेवून त्यांना पूर्णेच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ज्या निवेदनात विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.



पूर्णा शहर हे रेल्वे पटरीमुळे दोन विभागात विभागले गेल्याने दोन्ही कडील नागरिकांना ये जा करण्यास त्रासदायक आणि धोक्याचे झाले असल्याने व पटरी ओलांडून ये जा करणे शाळकरी मुलांनाही धोक्याचे असल्याने तेथे पादचारी पूल बनविण्यात यावा अशी प्रामुख्याने मागणी करण्यात आली आहे.याशिवाय प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर तिकीट खिडकी करण्यात यावी,एक आणि चार दोन्ही प्लॅटफॉमला जोडणारा नवीन एक दादरा करण्यात यावा.रेल्वे स्टेशन चे मंदगतीने चालणारे काम वेगाने होण्यासाठी संबधिताना सूचना देण्यात याव्यात.प्लॅटफॉर्म क्रमांक एक आणि चारवर लिफ्ट ची व्यवस्था करण्यात यावी. पूर्णा रेल्वे स्टेशनवर प्रवाशांसाठी रेस्टरूम आणि गार्डन ची व्यवस्था करण्यात यावी. पूर्णा येथे मोठ्या प्रमाणात सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी असल्याने त्यांच्यासाठी व कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी अद्यावत वैद्यकीय सुविधा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. पूर्णेत मुबलक पाणी पुरवठा असल्याने येथे रेल्वे प्रवासी डब्बे धुण्याचा डेपो उभारावा.रेल्वेच्या कम्युनिटी हॉल आणि रेल्वे इन्स्टिट्यूट मधे मुलांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावे,तेथे मनोरंजन, अध्ययन आणि सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात.

या निवेदनावर सहानुभूती पूर्वक विचार केल्या जाईल असे आश्वासन संजय श्रीवास्तव यांनी शिष्टमंडळाला दिले. या निवेदनावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश कांबळे,उपाध्यक्ष उत्तम खंदारे, ॲड. धम्मा खंदारे, ॲड.हर्षवर्धन गायकवाड,रौफ कुरेशी,प्रवीण कनकुटे, शिवाजी वेडे,मोहन लोखंडे,सय्यद कलीम,विजय बगाटे,अनंत काळे,संतोष एकलारे, विजय जोंधले ,अशोक कांबळे,गौतम काळे ,दादाराव पंडित आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



**मतदान प्रक्रियेसाठी कर्मचारी साहित्य घेऊन मतदान केंद्रांकडे रवाना**
**जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. परभणी तालुक्यातील मतदान केंद्रांवर मतदानाचे साहित्य घेऊन कर्मचारी रवाना होत आहेत. निवडणूक पारदर्शक व सुलभ पध्दतीने पार पाडण्यासाठी परभणी तालुक्याचे निवडणूक निर्णय अधिकारी उदयसिंह भोसले यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी मार्गदर्शन केले.**

### मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क अवश्य बजवावा - जिल्हाधिकारी चव्हाण

**परभणी,/प्रतिनिधी-** जल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीकरीता शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. मतदारांना सकाळी ७.३० ते सांयकाळी ५.३० या कालावधीत मतदान करता येणार आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदारांनी निर्भयपणे आपल्या मतदानाच अमूल्य हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे.
परभणी जिल्हयात एकूण ग्रापंचायती ७०५ असून जिल्हा परिषदेच्या ५४ गट तर पंचायत समितीच्या १०८गणांसाठी ही निवडणूक होणार आहे. सेलू तालुक्यात जिल्हा परिषदेचे ५ गट तर पंचयात समितीचे १० गण आहेत. जिंतूर तालुक्यात १० गट, २० गण, मानवत तालुक्यात ४ गट , ८ गण, पाथरी तालुक्यात ५ गट, १० गण, सोनपेठ तालुक्यात ३ गट, ६ गण, परभणी तालुक्यात १० गट, २० गण, गंगाखेड तालुक्यात ७ गट, १४ गण, पालम तालुक्यात ४ गट, ८ गण, तर पूर्णा तालुक्यात ६ गट व १२ गणांसाठी मतदान पार पडणार आहे.
मतदान केंद्रांची संख्या १२७८ आहे. एकूण मतदारांची संख्या १० लाख ४५ हजार ८५५ आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ४२ हजार ९३७, स्त्री मतदार ५ लाख २ हजार ९१३ तर तृत्तीयपंथीय मतदारांची संख्या ५ आहे.
मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मतदान केंद्रांवर मतदारांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. मतदानाच्या पार्श्वभुमीवर कडक सुरक्षा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.
मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी
परभणी, गंगाखेड, मानवत, पाथरी, पुर्णा, सेलु, जिंतुर, सोनपेठ, पालम या जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदान क्षेत्रातील मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मग ते कामानिमित्य निवडणुक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी, असे शासनाने निर्देश दिले आहेत.
हे आदेश मतदारसंघातील सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहतील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत कामगारांना मतदानासाठी सुट्टी देण्याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.
मतदान केंद्रावर मोबाईल वापरण्यास बंदी
मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी तसेच मतदान केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये.

## विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला वाढदिवस

### व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**जिंतूर,/प्रतिनिधी:** सामाजिक भान ठेवत व्हाईस ऑफ इंडियाचे राज्य कार्याध्यक्ष यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त नगरपरिषदेची सफाई कामगारांना साडीचोळी चे वाटप करून व घरोघरी पेपर वाटणाऱ्या मुलांना दहा लाखाचा विमा पॉलिसी वाटप करून वाढदिवस साजरा केला.

व्हॉइस ऑफ मीडिया व जिंतूर तालुका प्रेस क्लबच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला उपविभागीय महसूल अधिकारी शैलेश लाहोटी, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, गटविकास अधिकारी सुभाष मानकर, नायब तहसीलदार प्रशांत राखे ,प्राचार्य श्रीधर भोंबे, उद्योजक ब्रिजगोपाल तोष्णीवाल ,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड ,बालरोग तज्ञ डॉ दुर्गादास कानडकर, डॉ गणपत वाघमारे ,नगरपरिषदेचे उपाध्यक्ष टीका खान पठाण गटनेते सचिन गोरे नगरसेवक शेख अथर, डॉ. आबासाहेब जाधव, आदींची यावेळी उपस्थिती होती. व्हॉइस ऑफ मीडिया चे प्रदेश कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त शहरामध्ये स्वच्छतेचे काम करणाऱ्या सफाई कामगारांना साडी, चोळी देण्यात आली शिवाय दररोज घराघरात वर्तमानपत्र पोहोचविण्यात जिंतूर शहरातील पेपर वाटणाऱ्या मुलांचा दहा लाख रुपयाचा विमा करण्यात आला .उपक्रम मागील १० वर्षापासून राबविण्यात येत आहे. समाजातील वंचित घटकांची नोंद घेऊन त्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने मदत करणारा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे प्रतिपादन उपविभागीय महसूल अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले. यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी विजय चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित उपक्रमातून इतरांनी प्रेरणा घेऊन सामाजिक कार्यात पुढाकार घेण्याचे आवाहन करत विजय चोरडिया यांनी मागच्या दहा वर्षापासून केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड मनोज सारडा यांनी केले .

आभार प्रदर्शन जिंतूर तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष मंचक देशमुख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिंतूर तालुका व्हॉइस ऑफ मीडियाचे अध्यक्ष भागवत चव्हाण,सचिन रायपत्रीवार, संदीप माहूरकर, दिलीप देवकर ,पंकज चव्हाण, बोरीचे अध्यक्ष आनंद मुरक्या ,चारठाणाचे रंगनाथ गडदे प्रभाकर कुरे यांच्यासह अनेकांनी कार्यक्रमाविषयीसाठी परिश्रम घेतले.



## अग्रलेख...

# दुरवस्थेच्या दोन बाजू

कोणत्याही सुविधांमध्ये काहीही अडथळे आले आणि त्याचे रूपांतर संकटात होण्याची चिन्हे दिसू लागली की सरकारी यंत्रणा सहसा सर्वांसाठी एक सामायिक सूचना जारी करतात. ती म्हणजे, आवश्यकता नसेल तर घराबाहेर पडू नका, प्रवास टाळा! असे केले की संकटाची किंवा समस्येच्या गांभीर्याची झळ पोहोचणार नाही आणि संकटाच्या आसपास असण्याची शक्यतादेखील उरणार नसल्याने सर्वांच्या मनातील सुरक्षेची आश्वस्त जाणीव फारसे काही न करतादेखील सुरक्षित राहून सुरक्षा यंत्रणांवरील ताणही कमी होईल हे संबंधितांस माहीत असते. शिवाय, समस्येच्या झळा सोसाव्या लागणार नसल्यामुळे त्याच्या जबाबदारीचे खापर संबंधित यंत्रणांवर फोडण्याची संधीदेखील समाजास मिळणार नाही याचीही खात्री असते. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवणारा महामार्ग म्हणून ज्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गाचा अभिमानाने उल्लेख केला जातो, त्या मार्गावर तब्बल दीड दिवस पुणे-मुंबई दरम्यानची वाहतूक एका अपघातामुळे जागच्या जागी थांबली. वाटेवरच्या हजारो वाहनांच्या मैलोगणती रांगांनी रस्ता पूर्ण भरून गेला आणि असंख्य समस्यांच्या भयाने थिजलेली माणसे अक्षरश: हवालदिल झाली. या अपघातस्थळापासून २० किलोमीटर अंतरावर एकाच जागी थांबून ताटकळलेल्या वाहनांस तर पुढे काय झाले आहे तेदेखील नेमके कळत नव्हते. अशा संकटातही, महामार्गावरील टोल वसुली मात्र, पुढे काहीच घडलेले नाही अशा थंडपणाने सुरूच होती. एका विषारी, ज्वलनशील वायूची वाहतूक करणारा टँकर घाटात उलटल्याने वायुगळती सुरू झाली असून पुढे जाणे धोक्याचे आहे हे कळण्यासाठीही अनेक वाहनधारकांना कित्येक तास लागले आणि सुरक्षा यंत्रणांना अपघाताचा सुगावा लागेपर्यंत वाहनांच्या रांगेचे शेपूट मैलामैलाने वाढतच राहिले. लहान मुले, महिला, वृद्ध माणसे, महत्त्वाच्या वा तातडीच्या कामाकरिता मुंबईकडे निघालेले नागरिक, विमान प्रवासाकरिता मुंबई गाठण्याची घाई करणारी माणसे, हातावरचे पोट असलेले कष्टकरी, अशा सर्वांनाच अशा समस्यांचा सरसकट फटका बसत असतो. महागड्या आलिशान गाडीतील धनवंत किंवा एखाद्या मालवाहू गाडीच्या हैद्यातून प्रवास करणारा सामान्य हमाल हे सारख्याच प्रमाणात हलाखीचा अनुभव घेतात. असा भेदभाव पुसून टाकणारे एक संकट तब्बल ३३ तास महामार्गावर दाटून राहिले, आणि ते गंभीर होत असल्याची जाणीव होऊ लागल्यावर संबंधित यंत्रणांनी तोच, नेहमीचा संदेश जारी केला. अत्यंत आवश्यक नसेल तर या मार्गावरील प्रवास टाळा अशा सूचना माध्यमे, समाजमाधमांवरून जारी झाल्या, तेव्हा त्याआधीच प्रवासकोंडीत अडकलेले हतबल प्रवासी संकटातून सुटकेची प्रतीक्षा करत सरकार आणि सुरक्षा यंत्रणांकडे आशेने नजरा लावून ताटकळत होते.

यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग असे या महामार्गाचे नाव असले, तरी अलिकडच्या काही वर्षांपासून या मार्गावरून द्रुतगती तर दूरच, किमान सरासरी वेगाने वाहने चालविणेदेखील दुरापास्त होऊ लागले आहे. या समस्येस सर्वस्वी सरकार जबाबदार आहे असे सरसकटपणे म्हणता येणार नाही, पण समस्येवर तोडगा असूनही सरकारी यंत्रणा त्याकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप होत असल्याने, सरकारवरील जबाबदारीही दूर करता येणार नाही. कोणत्याही रस्त्यावर वाहनांच्या वाहतुकीची एक शिस्त असते. त्यासाठी काही कायदे, नियमही आखलेले असतात आणि ते पाळणे ही नागरिकशास्त्र म्हणून समाजाचीही जबाबदारी असते. पण आजकाल अनेकदा वेळेबरोबर धावण्याच्या अपरिहार्य स्पर्धेमुळे पायालादेखील भिंगरी लावून पळापळ करणारा समाज नियम पाळून वेळ वाया घालवण्याच्या मन:स्थितीत दिसत नाही. त्यासाठी प्रसंगी तो दंडात्मक कारवाईदेखील ओढवून घेतो आणि नियमाच्या कचाट्यातून सुटका करून घेतो. कदाचित त्यामुळेच, नियम मोडणारी माणसे हा दंडाच्या महसुलाचा मोठा स्रोत ठरू लागला असून वाहतुकीस शिस्त लावण्यासाठी नेमक्या जागी उभे राहण्याऐवजी दडी मारून बसणे व नियम मोडणाऱ्याकडून वसुली करणे हीच 'ड्युटी' मानण्याचा गैरसमजही वाढीस लागला असावा. कदाचित, वाहतुकीचे नियम मोडणारी वाहने हा महसुलाचा मोठा स्रोत ठरत असल्यामुळेच त्या बेशिस्तीकडे कानाडोळा होत असला, तरी शिस्तीत जाणाऱ्या वाहनधारकांची परवड तरी लक्षात घ्यायला हवी. तसे होत नाही हाच बहुतांश खाजगी वाहनधारकांचा अनुभव असतो. हीच बाब महामार्गांवर किंवा स्थानिक रस्त्यांवरही दिसत असल्याने, जेव्हा अशाच अपघातातून समस्या उग्र होतात तेव्हा लोकांनाच घराबाहेर न पडण्याच्या सूचना देऊन समस्येची झळ शमविण्याचे प्रयत्न सुरू होतात.

मुळात, हेच टाळण्याची गरज या महामार्गावरील ताज्या समस्येने अधोरेखित केली आहे. मुंबई-पुणे दरम्यानचा हा महामार्ग केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर देशातील रस्ते वाहतुकीचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील भाग आहे, त्यामुळे अशा घटना वारंवार घडत असतील तर त्यावर तातडीने योग्य उपाययोजना करण्याकरिता कठोर होण्याची गरज आहे. या उपाययोजना फारशा अवघड नाहीत, हे एव्हाना स्पष्ट झालेले आहे. मार्गावरील अवजड वाहने आणि हलकी वाहने यांना रस्ता पार करण्याकरिता आखून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे हे जसे वाहनधारकांचे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणे या नियमांचे काटेकोर पालन होते किंवा नाही हे पाहणे ही संबंधित यंत्रणांची जबाबदारीदेखील आहे. महामार्गावर या कामाकरिता पुरेसे मनुष्यबळ तैनात केल्यास होणारी वेळेची बचत, इंधनखर्चातील बचत आणि मुख्य म्हणजे, प्रवास करणाऱ्या माणसांना व्यवस्थेविषयी वाटणारा आदर या बाबींचा हिशेब मनुष्यबळाचा खर्च भरून काढण्यासाठी पुरेसा ठरू शकतो, हेही लक्षात घ्यावयास हवे. एका बाजूला विकासाचा ध्यास आहे, सुशासनाची ग्वाही आहे आणि त्याच विकासाच्या वेडापायी मोजावी लागणारी किंमत अशा मानसिक, शारीरिक, आर्थिक मनस्तापाचे रूप घेऊन उग्र होत असेल, तर सुशासनाच्या संकल्पनेवरील विश्वास कमी होत जाईल. केवळ व्यवस्थांच्या अभावामुळे तसे होणे योग्यदेखील नाही. कारण, सर्व यंत्रणा व व्यवस्था अखेरीस समाजहितासाठी बांधील असल्या पाहिजेत अशीच समाजाची धारणा असते. या वाहतूक कोंडीने अनेक त्रुटींची जाणीव नव्याने करून दिली आहे. महामार्गासारख्या वेगवान सुविधा निर्माण करताना, त्यावरील संभाव्य समस्या लक्षात घेऊन त्यावरील पर्यायांची व्यवस्थाही अगोदर निर्माण करणे गरजेचे असते, हा जुनाच धडा नव्याने दिला गेला आहे. तशी सक्षम आणि पुरेशी व्यवस्था या ठिकाणी नाही, अशा प्रसंगातून तातडीने मार्ग काढण्याकरिता वेगवान हालचाली आणि निर्णय घेण्याची गरज असते. या बाबतीतही काहीशी उदासीनताच असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. अगोदरच गैरसोयींमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना सुविधा देण्याची घाई करण्याऐवजी त्यांच्याकडून टोल वसुली करून टोल कंत्राटदारांनी माणुसकीशून्य मानसिकतेचे दर्शन घडविल्याचा प्रवाशांचा आरोप आहे. या समस्येमुळे प्रवाशांना जेवढा मानसिक त्रास झाला, त्याहूनही अधिक मनस्ताप या वागणुकीमुळे झाल्याचे प्रवाशांनी समाजमाध्यमांवरून व्यक्त केलेल्या भावनांमधून स्पष्ट झाले आहे. यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावरील ही समस्या म्हणजे, संभाव्य समस्यांची पूर्वसूचना ठरू शकते. असेच प्रकार देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात घडू शकतात, तेव्हा माणुसकीने जिवंत असायला हवे, ही जाणीव या समस्येने करून दिली आहे. अशा जिवंत माणुसकीचे दर्शन या संकटकाळात अनेकांना घडले होते. तासन्‌तास एका जागी खोळंबल्यामुळे अनेक मुले भुकेने कळवळली, अनेकांना उपाशी राहण्याची वेळ आली, अनेकांना नैसर्गिक विधींची कुचंबणा सहन करावी लागली आणि अशा वेळी पोलिसांच्या काही पथकांनी या माणुसकीचेही दर्शन घडविले. फळे, पाणी, बिस्किटांसारख्या वस्तूंचे वाटप करण्यासाठी संपूर्ण मार्गावर पायपीट करणारे पोलिस कर्मचारी हे त्या काळातील माणुसकीचे दूत ठरले, पण माणुसकीशून्य मानसिकतेच्या कटू अनुभवांनी त्यावर मात केली. विकास, सुविधा, सुशासनाच्या ध्यासाने सुरू असलेल्या वाटचालीला माणुसकीचा ओलावा असायला हवा, ही या संकटाने दिलेली महत्त्वाची शिकवण आहे.

---

## विशेष

**विवेक गिरिधारी**

# बस्तरच्या अरण्यछायेतील सेवाकार्य!

तरुण वयात आयुष्यभर सामाजिक सेवा करण्याचे स्वप्न बघणारे अनेक जण असतात. काही जण तसे बोलूनही दाखवतात. परंतु फारच थोडे लोक ते प्रत्यक्षात आणण्याचे धाडस दाखवू शकतात. अशा मोजक्या लोकांपैकीच डॉ. राम व सुनीता गोडबोले हे सेवासमर्पित दाम्पत्य आहे. हे दाम्पत्य गेल्या तीन तपांहून अधिक काळ वनवासी जनजाती समाजाच्या सेवेत रममाण झाले आहे. नक्षलवादामुळे सर्वांना परिचित असलेल्या छत्तीसगड राज्यातील बस्तर परिसरातील दंतेवाडा जिल्ह्यात सध्या हे दाम्पत्य काम करीत आहेत. दीड तपाहून अधिककाळ वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बस्तरमध्ये आदिवासी जनजाती महिलांमध्ये सुनीताताई काम करीत आहेत.

मूळच्या पुणेकर असणाऱ्या सुनीताताई या सहकारनगरमधील पूर्वाश्रमीच्या सुनीता पुराणिक आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थिदशेत त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आल्या व सामाजिक कामाशी अधिकाधिक संलग्न होत गेल्या. अभाविपचे तत्कालीन ज्येष्ठ नेते यशवंतराव केळकर व बाळासाहेब आपटे यांच्या अभ्यासवर्गातील मांडणीमधून त्यांना सामाजिक कार्याची दृष्टी मिळाली. स्वत:कडे न बघता समाजाकडे बघितले पाहिजे या दृढ संस्काराचा वसा मिळाला. त्यातूनच त्यांचे आयुष्यभर आदिवासी भागात प्रत्यक्ष राहून काम करण्याची दिशा निश्चित होत गेली. त्यानुसारच त्यांनी मग ठरवून सामाजिक सेवेच्या संदर्भातील एमएसडब्लूचे पदव्युत्तर शिक्षण कर्वे शिक्षणसंस्थेतून पूर्ण केले. काही काळ पुण्यातील एका सामाजिक संस्थेत अनुभवासाठी दोन वर्ष नोकरी केली. परंतु आयुष्यभर आदिवासी भागात काम करण्याचे स्वप्न काही त्यांना स्वस्थ बसू देईना.

**वनवासी क्षेत्राचा परिचय :** तत्कालीन संघ प्रांत प्रचारक कै. दामुअण्णा दाते यांच्याशी बोलणे करून त्यांच्या योजनेनुसार प्रत्यक्ष वनवासी क्षेत्रातील सुनीताताईंच्या पूर्ण वेळ कामास सुरुवात झाली. १९८४ मध्ये सुरुवातीला सहा महिने त्या ठाणे जिल्ह्यातील तलासरी केंद्रावर राहिल्या. त्यावेळेस कै. केशवराव केळकर हे ज्येष्ठ संघप्रचारक वनवासी क्षेत्रात अत्यंत आत्मीयतेने कार्यरत होते. त्यांची त्यावेळेसची वनवासी भगिनींसाठी दिवाळीची 'साडी-चोळी भाऊबीज' योजना अनेकांच्या आजही स्मरणात आहे. अशा या केशवरावांबरोबर वनवासी क्षेत्रात प्रासंगिक फिरण्याची संधी सुनीताताईंना मिळाली. त्यातून त्यांना वनवासी समाजाची खरी ओळख झाली. सुरुवातीला फक्त काही वर्षे वनवासी क्षेत्रात काम करण्याचा त्यांना विचार होता.

सहा महिन्यांची उमेदवारी संपल्यानंतर सुनीताताईंची रायगड जिल्ह्यातील जांभिवली केंद्रावर वनवासी कल्याण आश्रमाचे पूर्ण वेळ काम करण्यास रीतसर सुरुवात झाली. त्यावेळेस जांभिवली केंद्रावर काम करण्यास नुकतेच कुंटे काका-काकूंनी सुरुवात केली होती. या जोडगोळीची आणि सुनीताताईंची चांगली गट्टी जमली. आदिवासी भागात



प्रत्यक्ष राहून वैद्यकीय सेवा देण्याची स्वप्ने पाहणाऱ्या डॉ. राम गोडबोले यांच्याशी त्यांचे १९९० मध्ये लग्न झाले. लग्नानंतर छत्तीसगढ-बस्तरला जाण्याचे आवाहन या नवविवाहित दाम्पत्याला वनवासी कल्याण आश्रमाचे तत्कालीन संघटनमंत्री भास्करराव कळंबी यांनी केले. या प्रस्तावास अनुकूलता दर्शवत लगेचच या नवविवाहित दाम्पत्याने बस्तरमध्ये वनवासी कल्याण आश्रमाचे एक तपासाठी पूर्णवेळ राहून काम करण्याचा निर्णय निर्धारपूर्वक घेतला. अन लगोलग दाखलही झाले.

दंतेवाडा जिल्ह्यातील बारसूर (ता. गीदम) येथील आदिवासी मुलीच्या छात्रावासाची महत्त्वाची जबाबदारी सुनीताताईंनी स्वीकारली आणि डॉ. राम गोडबोले यांनी वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून बारसूरमध्येच दवाखाना सुरू करून आदिवासींना वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली. पूर्वायुष्य पूर्णपणे शहरात गेलेल्या या सुशिक्षित नवविवाहित दाम्पत्याची सहजीवनाची सुरुवात बस्तरमधील मातीच्या घरात झाली. दीड वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या व पडक्या स्थितीत असलेला दवाखाना आता पुन्हा आदिवासी रुग्णांनी गजबजू लागला. सुनीताताईंमुळे बारसूरला आदिवासी मुलींचे वसतिगृह नव्याने १९९१मध्ये चालू करण्यात आले. वसतिगृहात शिकायला मुली आणण्यासाठी आदिवासी पाड्यांमध्ये सुरुवात झाली. या कामाशी सुनीताताई एवढ्या समरस झाल्या की त्यांनी झटपट तेथील आदिवासींची स्थानिक 'गोंडी व हल्बी' भाषा शिकून घेतली. त्यातून त्यांचा स्थानिक आदिवासींशी सहजपणे व सफाईदारपणे संवाद होऊ लागला. स्थानिक भाषा येण्याचा मोठा फायदा डॉ. राम गोडबोले चालवत असलेल्या दवाखान्यातील रुग्णांची संख्या स्वाभाविकपणे वाढण्यात झाला. प्रतिवर्षी बस्तर दौऱ्यात गोडबोले पती-पत्नीची भेट घेऊन त्यांच्या कामाची जिव्हाळ्याने विचारपूस करण्याचा भास्करराव कळंबी यांचा परिपाठ २००१ पर्यंत चालू होता. कार्यकर्त्यांना सांभाळणे व कायम प्रेरणा देत राहणे, हे भास्कररावांचे स्वभाववैशिष्ट्य होते. आजही भास्कररावांच्या आठवणी या गोडबोले पतीपत्नींसाठी एक हळवा कोपरा आहे.

ठरविल्याप्रमाणे एक तप पूर्णवेळ काम केल्यानंतर २००२मध्ये सुनीताताईंना कौटुंबिक आजारपण व अन्य कारणांमुळे महाराष्ट्रात येण्याचा निर्णय घ्यावा लागला. या दरम्यान त्यांनी पालघर जिल्ह्यातील विक्रमगड परिसरात किशोरी मुलींचे आरोग्यशिक्षण व वनवासी महिलांच्या संघटनाचे काम प्रत्यक्ष राहून केले. दहा वर्षे तेथे काम केल्यानंतर त्यांना पुन्हा बस्तरची ओढ वाटू लागली. बस्तरमध्ये आपल्याशिवाय कोण जाणार? असा विचार करून अखेरीस २०१२ साली पुन्हा बस्तरमध्ये पुढील दहा वर्षांसाठी कामाला जाण्याचा निर्णय डॉ. राम व सुनीता गोडबोले यांनी घेतला व ते परत बस्तरमध्ये लगेचच दाखल झाले.

**बस्तरमधील कामाचे बदलत जाणारे स्वरूप :** दरम्यानच्या काळात २००० साली छत्तीसगड वेगळे राज्य झाले. पुढे टप्प्याटप्प्याने मूळ बस्तर प्रदेशाचे सात आदिवासी जिल्हे झाले. बदलत्या परिस्थितीनुसार व स्थानिक कामाच्या गरजेनुसार बस्तरमधील कामाचे स्वरूप बदलत गेले. दोघेही वनवासी कल्याण आश्रमाच्या बारसूर कार्यालयात सध्या राहत आहेत. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या प्रथम श्रेणी न्यायाधीशांचे अधिकार प्राप्त असणाऱ्या न्यायपीठाच्या अधिकारी सदस्या म्हणून सुनीताताईंनी अलिकडे पाच वर्षे काम केलेले आहे. डॉ. राम गोडबोले हेही आता पूर्वीसारखा एका जागी दवाखाना चालवत नसून गावोगाव आरोग्य शिबिरे घेत आहेत. हैदराबादवरून रातोरात लांबचा प्रवास करून अत्यंत नियमितपणे आरोग्य शिबिरांना उपस्थित राहणारे डॉ. करमाळकर या तज्ज्ञ डॉक्टरांची मोलाची साथ गेले काही वर्ष मिळत आहे.

**बस्तरमधील विधायक कामाचे ऊर्जा केंद्र :** गेल्या पाच-दहा वर्षांत बस्तरसारख्या दुर्गम प्रदेशात सामाजिक काम करण्याच्या ऊर्मीने अनेक युवक-युवती देशभरातून दाखल होत आहेत. तेलंगणातील प्रणीत सिंम्भा तसेच महाराष्ट्रातील आकाश बडवे, ज्योती पटाले, श्रीराम देशपांडे आणि उत्तरप्रदेशमधील आशिष-शालिनी श्रीवास्तव हे यापैकी काही जण आहेत. देशातला सर्वांत मागास प्रदेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बस्तरसारख्या सुदूर परिसरात आरोग्य, शिक्षण व कुपोषण या क्षेत्रात हे सेवासमर्पित दाम्पत्य भरीव योगदान करीत आहे. त्यांच्या अविरत चालणाऱ्या कामाची दखल घेऊन त्यांना पुण्यातील नातू प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार देऊन यापूर्वी गौरविण्यात आले आहे. वनवासी रुग्णांना जीवदान मिळवून देणाऱ्या त्यांच्या सेवाभावी मानवतावादी कार्याची दखल बाया कर्वे पुरस्कारामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राने घेतली. आता तर 'पद्मश्री'सारख्या राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेच्या सन्मान पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे. खरे तर पर्यटनात आघाडीवर असणारी महाराष्ट्रीय मंडळी देश-विदेश धुंडाळत फिरत असतात. यापैकी काहींनी तरी वाकडी वाट करून पर्यटनाच्या निमित्ताने बस्तरला जाऊन गोडबोले दाम्पत्याला भेटायला काय हरकत आहे?

९४२२२३१९६७

---

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# म्हणून शेगाव श्रेष्ठ आहे!

महाराष्ट्राची आन, बान, शान विदर्भ आहे. कोळसा आणि निसर्गातही विदर्भ समृद्ध आहे. या सोबतच आमच्या विदर्भाची शान ज्या तीर्थक्षेत्राने वाढवली ते तीर्थक्षेत्र म्हणजे संत गजानन महाराजांच्या पावस्पर्शाने पुनीत झालेले शेगाव! शेगाव म्हणजे भक्ती, शिस्त, स्वच्छता आणि सेवाभावाचा संगम. महाराष्ट्रात अनेक तीर्थक्षेत्रे आहेत, अनेक देवस्थानांना ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व आहे; परंतु, शेगावच्या व्यवस्थापनाची सर कोणीही करू शकले नाही. कारण येथे केवळ दर्शनाची सोय नाही तर सेवाभावाचा सुगंध पावलोपावली दरवळतो. 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश येथे केवळ पाट्यांवर नाही तर प्रत्यक्ष कृतीत आहे. दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची सोय करण्यासाठी प्रशस्त रांगा, शिस्तबद्ध प्रवेशमार्ग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, भोजनालय, निवासस्थान अशा सर्व सुविधा अगदी मोफत किंवा अत्यल्प दरात आहेत. कुठेही ढकलाढकली नाही, गोंधळ नाही संतांचे दलाल नाहीत. दर्शन व्यवस्थेतील शिस्त विशेष उल्लेखनीय आहे. अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये तासन्‌तास रांगेत उभे राहूनही गोंधळाचा सामना करावा लागतो; पण शेगावात जय गजानन, श्री गजाननच्या जयघोषात रांग हळूहळू पुढे सरकत महाराजांच्या समाधीपुढे उभे राहण्याचा क्षण येतो. त्या क्षणी मन कृतज्ञतेने भरून येते. महत्त्वाचे म्हणजे समाधी आणि मुख दर्शन किती वेळात होईल याचा लागलेला फलक तुमच्या मनातली घालमेल क्षणात संपवून टाकतो. त्यामुळे इतर तीर्थक्षेत्रांपेक्षा शेगाव हे तीर्थक्षेत्र श्रेष्ठ ठरते आहे स्वच्छता आणि व्यवस्थापनात. (संताचा वास सर्व ठिकाणी समान आहे.) शेगावच्या प्रसादाची परंपरा तर विलक्षण आहे.

येथे प्रसाद म्हणजे केवळ काही गोडधोड नव्हे तर तो प्रेमाचा आणि समतेचा प्रतीक आहे. गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, स्त्री-पुरुष असा कोणताही भेद न करता प्रत्येकाला समान प्रसाद दिला जातो. भोजनालयात हजारो लोक एकत्र बसून जेवतात. कुणाला उपाशी राहावे लागत नाही. अगदी एकादशीला पोटभर उसळही तेवढ्याच भक्तिभावाने दिली जाते. शेगावच्या व्यवस्थेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नियमबद्धता. येथे प्रत्येक गोष्ट नियमांनुसार चालते. रांगेत शिस्त, परिसरात स्वच्छता, आवाजावर नियंत्रण, सेवेकऱ्यांचे नम्र वर्तन यासोबतच निवास व्यवस्थेत 'सेवेकरांवर लोभ न दाखवता त्यांच्याप्रति लोभ असू द्या,' या एका वाक्याने संतनगरी शेगावची महती स्पष्ट होते अन् देवदर्शनच नाही तर संस्कारही मिळतात! शेगावात येणारा प्रत्येक भाविक काही ना काही शिकून जातो. येथे सेवा करणारे स्वयंसेवक दिवस-रात्र कार्यरत असतात. कुणी पाणी देत असतो, कुणी रांग सांभाळत असतो, कुणी साफसफाई करत असतो. त्यांना मोबदल्याची अपेक्षा नसते. 'महाराजांची सेवा' हीच त्यांची कमाई असते. ग्रामीण भागातून आलेल्या भाविकांपासून ते शहरातील सुशिक्षित लोकांपर्यंत सर्वांना येथे समान वागणूक मिळते. कुणालाही विशेष वागणूक नाही. ही समतेची भावना शेगावला इतर तीर्थक्षेत्रांपेक्षा वेगळे स्थान देते. आज अनेक धार्मिक स्थळांवर व्यापारीकरण वाढताना दिसते. दर्शनासाठी पैसे, प्रसादासाठी पैसे, पार्किंगसाठी पैसे, सर्वत्र व्यवहार दिसतो. पण शेगावात मात्र 'सेवा' हा शब्द अजूनही जिवंत आहे. येथे भक्ती आहे, शिस्त आहे, स्वच्छता आहे, सेवा आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणुसकी आहे. शेगाव हे केवळ तीर्थक्षेत्र नाही, तर संस्कारांचे, सेवाभावाचे आणि आदर्श व्यवस्थापनाचे विद्यापीठच आहे. शेगाववरून आषाढीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या पालखीची शिस्त एक आदर्श उदाहरण ठरावे. या मंदिराचे विश्वस्त शंकरदादा पाटील यांनी हयात असेपर्यंत या मंदिरातील घोटभर पाणी सुद्धा पिले नाही. तोच वारसा त्यांचे चिरंजीव सांभाळत आहेत. आनंद सागर प्रकल्पामुळे शेगावचे रूप आणखी खुलले होते. हे केवळ पर्यटनस्थळ नाही तर अध्यात्माला संस्कृतीची जोड होती. बाग, खेळांची साधने, मुलांसाठी मनोरंजन, ध्यानधारणा केंद्र नियोजनबद्ध होते.

कुटुंबासोबत वेळ घालवताना मन प्रसन्न होत होते. त्यामुळे तो प्रकल्प शेगावच्या व्यवस्थापन कौशल्याचा जिवंत पुरावा होता. दुर्दैवाने त्याला कोणाची तरी दृष्ट लागली आहे. तो प्रकल्प बंद पडला असला तरी भक्त आनंद सागर विसरले नाहीत. आनंद सागर परत सुरू व्हावे ही विदर्भातील प्रत्येक गजानन भक्ताची मनोमन इच्छा आहे. या प्रकल्पासाठी शासन आणि प्रशासनाने पुढाकार घेणे तेवढे अपेक्षित आहे. राजकारणविरहित हा प्रकल्प यशस्वी करण्याची जबाबदारी कोणीतरी एकाने घेतल्यास विदर्भातील हा प्रकल्प उंची गाठल्याशिवाय राहणार नाही. मंदिरांमध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्यांनी, व्यवस्थापनात गलथान असणाऱ्यांनी एकदा तरी शेगावच्या व्यवस्थापनाचा आदर्श घ्यावा! प्रकटदिन सप्ताह सुरू झालेला आहे. प्रकट दिनानिमित्त गजानन महाराजांना तरुण भारतचे शतशत नमन.

९८८१९०३७६५

---

## प्रासंगिक

**रवींद्र भुसारी**

# वारस भगीरथाचे, फुलवी मळे चैतन्याचे

दि. १० आणि ११ जानेवारी हे दोन दिवस नागपुरातील दोन कार्यक्रमांमुळे अविस्मरणीय व ऊर्जादायी ठरले. अमृतानुभव ठरलेल्या या दोन्ही कार्यक्रमांना उपस्थित राहता आले, याचा खूप आनंद झाला आणि स्वाभाविकच मुखातून शब्द उमटले - वारस भगीरथाचे, फुलवी मळे चैतन्याचे. आधुनिक भगीरथ असलेल्या डॉ. हेडगेवारांनी भारतभूमीवर संघगंगा प्रवाहित केली आणि आज शंभर वर्षांनंतरही या भगीरथाचे वारस देशभक्तीने भारलेली चैतन्याची मळे कशी फुलवत आहेत, याचे प्रत्यक्ष दर्शन जणू पुन्हा पुन्हा घडले. म्हणूनच या दोन्ही उपक्रमांचे शब्दचित्रण करण्याचा हा प्रयत्न आहे.

दि. १० जानेवारी रोजी विलासजी फडणवीस स्मृती जिव्हाळा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जिव्हाळा परिवारातर्फे आयोजित हा सोहळा आय. टी. पार्क, नागपूर येथील पर्सिस्टंट सिस्टिम्सच्या 'कविकुलगुरू कालिदास सभागृहात' संपन्न झाला. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त समाजासमोर पंचपरिवर्तन ही सूत्रे मांडण्यात आली असून, या पाच मूल्यांना सक्षम करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या पंचमूल्यांवर निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या समाजातील विविध प्रेरक व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करणे, हाच या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. विशेष म्हणजे, हा सन्मान संघाच्या पाच प्रचारकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संघाचे माजी प्रचारक रवींद्र देशपांडे यांनी या पाच प्रचारकांशी साधलेला आत्मीय संवाद हे या कार्यक्रमाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरले. ज्या 'वंदे मातरम्' गीताने भारतीयांच्या मनात देशभक्तीचे स्फुलिंग चेतवले, त्या गीताच्या सार्धशती वर्षानिमित्त त्याच्या ओजस्वी गायनाने कार्यक्रमाचा मंगल प्रारंभ अधिकच तेजस्वी झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशुतोषजी फडणवीस यांनी केले, तर समारोप नागेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिव्हाळा कन्या निवासाच्या भगिनींनी सादर केलेल्या 'पसायदानाने' करण्यात आला. नागपूरच्या गांधीनगरातील शाखा स्व. विलासजींनी सुरू केली होती. ८० च्या दशकात त्या शाखेतून पाच स्वयंसेवक प्रचारक घडले - पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव, अ. भा. सहप्रचारक प्रमुख सुनील कुळकर्णी, अ. भा. सहसंपर्क प्रमुख सुनील देशपांडे, विवेकानंद केंद्राचे अ. भा. कोषाध्यक्ष प्रवीण दाभोळकर आणि मी - रवींद्र भुसारी. आम्हा पाच प्रचारकांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले आणि आमच्याशी आत्मीय संवाद साधण्यात आला. सर्व प्रचारक नागपूरमधूनच प्रचारक जीवनात आले. मी, सुनील कुळकर्णी आणि प्रवीण दाभोळकर यांनी नोकरीचा राजीनामा देऊन, तर इतरांनी शिक्षण पूर्ण होताच प्रचारक जीवन स्वीकारले. संघाच्या प्रचारकांचे जीवन नेहमीच खडतर असते. दोन वेळच्या जेवणाचीही शाश्वती नसते.

**पुरस्कार वितरण :** सामाजिक समरसता क्षेत्रात भन्ते अभय नायक थेरा यांना 'संचेती फाऊंडेशन पुरस्कार' सुनील देशपांडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. स्वदेशी कार्य क्षेत्रात सुरेश पितळे यांना 'श्री मोरेश्वर माधव देशपांडे पुरस्कार' प्रवीण दाभोळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कुटुंब प्रबोधन क्षेत्रात अधिवक्ता सीमा घाटे यांना 'स्व. प्रभाकरराव मुंडले स्मृती पुरस्कार' पद्मश्री डॉ. धनंजय सगदेव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पर्यावरण संवर्धन क्षेत्रात सचिन नायडू यांना 'श्रीधरराव विचोरे पुरस्कार' सुनील कुळकर्णी यांच्या हस्ते देण्यात आला. नागरी कर्तव्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी रवींद्र परांजपे यांना 'स्व. सरस्वतीदेवी बिहारीलाल खंडेलवाल स्मृती पुरस्कार' आयोजकांनी माझ्या हस्ते प्रदान केला. संघाच्या शताब्दी वर्षाचे औचित्य साधून, समाजातील पाच महत्त्वाच्या क्षेत्रांत (पंचपरिवर्तन) नि:स्पृहपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना ५१,००० रुपये, प्रभू श्रीरामांची प्रतिमा, मानपत्र व विलासजींवरील पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले.रा. स्व. संघ विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे यांनी आपल्या भाषणात विलासजींच्या स्मृतींना उजाळा दिला. ते म्हणाले, विलासजी हे केवळ व्यक्ती नव्हते; ते ऊर्जेचे उगमस्थान होते. त्यांच्या अथांग जिव्हाळ्यामुळेच अनेक तरुण राष्ट्रकार्यासाठी प्रेरित झाले. त्यांच्यातील हे अलौकिकत्व अनुभवूनच उपस्थित पाचही प्रचारक राष्ट्रसेवेत निमग्न झाले आहेत. नव्या पिढीने या 'दीपस्तंभा'चा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे ही काळाची गरज आहे. पुरस्कारार्थींच्या सन्मानार्थ मानपत्रांचे वाचन हा सोहळ्याचा विशेष भाग होता. श्रद्धा भारद्वाज, डॉ. अभिजित अंभईकर, गौरी बेलन, डॉ. सीमा देशपांडे आणि रूपा फडणवीस यांनी मानपत्रांचे इतक्या भावपूर्ण शैलीत वाचन केले की संपूर्ण सभागृह भारावून गेले. डॉ. भाग्यलक्ष्मी देशकर यांचे सूत्रसंचालन अप्रतिम होते.

**दि. ११ जानेवारी : स्मृती आणि ध्येयाचा त्रिवेणी संगम**

स्वर्गीय विलासजींच्या दूरदृष्टीतून उभी राहिलेली गांधीनगर संघशाखा केवळ एक शाखा नसून, ती संस्कारांची जननी आहे. याच मातीतून पाच ध्येयवेडे प्रचारक घडले. त्यांच्याशी झालेला आत्मीय संवाद, विलासजींच्या स्मृतींना दिलेला उजाळा आणि पंचपरिवर्तनासाठी अहोरात्र झटणाऱ्या सेवाव्रतींचा सन्मान यामुळे वातावरण एखाद्या तीर्थक्षेत्राप्रमाणे पवित्र झाले होते.

शाखेच्या वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने वस्तीतून निघालेले पथसंचलन म्हणजे शिस्तीचे दर्शनच होते. घोषाच्या लयबद्ध तालावर पडणारी स्वयंसेवकांची पावले परिसरात चैतन्य जागवत होती. स्वागत प्रणामाने सुरू झालेला कार्यक्रम अचूकपणे ६० व्या मिनिटाला 'संघ-विकीर'ने संपन्न झाला. या एका तासात शिशूंचे खेळ, बालकांचे नियुद्ध, तरुणांचे थरारक दंडयुद्ध आणि व्यावसायिकांची योगासने पाहून उपस्थित प्रेक्षक भारावून गेले. विशेष म्हणजे, बाल स्वयंसेवकांनी अमृतवचन, सुभाषित व संघगीत कोणताही कागद न पाहता आत्मविश्वासाने सादर केले. महाविद्यालयीन तरुण कार्यवाहांचे प्रास्ताविक नेतृत्वगुण दर्शविणारे होते. नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकांची पृष्ठभूमी असतानाही, बाह्य राजकीय कोलाहलापासून अलिप्त राहून शांतचित्ताने कार्य करणे ही खरी साधना आहे. गांधीनगरच्या स्वयंसेवकांनी कृतीतून हेच सिद्ध केले की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येयपथावरील पाऊल कधीच डगमगत नाही.

९५९४७५३४४४

---

## खाजगी नेटवर्कचा ५ जीचा गाजावाजा आणि संथ इंटरनेट



देश डिजिटल युगात वेगाने पुढे जात असल्याचे चित्र रंगवले जात असताना मोबाईल इंटरनेट सेवेचे वास्तव मात्र वेगळेच प्रश्न निर्माण करत आहे. ५ जीच्या नावाने जाहिरातींचा भडिमार सुरू असला, तरी प्रत्यक्षात ग्राहकांच्या हाती येणारी सेवा ३ जी किंवा ४ जीपेक्षाही कमी गतीची असल्याचा अनुभव मोठ्या प्रमाणावर येत आहे. हा केवळ तांत्रिक प्रश्न नसून तो ग्राहकांच्या विश्वासाशी खेळ करणारा प्रकार ठरत आहे. शहरी भाग असो वा ग्रामीण, इंटरनेट संथ गतीने चालणे, नेटवर्क सतत खंडित होणे, कॉल ड्रॉप होणे, ऑनलाईन सेवा ठप्प होणे या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. शिक्षण, आरोग्य, बँकिंग, शासकीय योजना, रोजगार, व्यवसाय अशा प्रत्येक क्षेत्रात इंटरनेट हा मूलभूत घटक झाला असताना अशी निकृष्ट सेवा देणे म्हणजे विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह उभे करणे होय.

ग्रामीण भागात अजूनही नेटवर्क आहे पण इंटरनेट नाही अशी स्थिती आहे. टॉवर उभे आहेत, पण स्पीड नाही. शहरी भागात महागडे रिचार्ज असूनही गर्दीच्या वेळेत इंटरनेट पूर्णपणे ठप्प होते.

यामुळे स्पष्ट होते की समस्या फक्त तंत्रज्ञानाची नाही, तर व्यवस्थापन आणि नियोजनाच्या अपयशाची आहे. खाजगी मोबाईल कंपन्या दरमहा मोठ्या प्रमाणात शुल्क आकारतात, पण सेवा दर्जाबाबत जबाबदारी स्वीकारताना मात्र टाळाटाळ करतात. ग्राहकांनी तक्रार केल्यास अपग्रेड सुरू आहे, नेटवर्क सुधारत आहे अशी ठरावीक उत्तरे दिली जातात. मात्र महिन्यांनंतरही परिस्थितीत फारसा बदल होत नाही. जाहिरातीत दाखवलेला वेग आणि प्रत्यक्षातील वेग यात मोठी दरी दिसून येते.

## वाचक पत्रे

या पृष्ठभूमीवर दूरसंचार नियामक संस्था आणि शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. केवळ तंत्रज्ञानाच्या घोषणा करून भागणार नाही, तर सेवेच्या गुणवत्तेवर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. ग्राहकांना प्रत्यक्ष मिळणाऱ्या इंटरनेट स्पीडची पारदर्शक माहिती देणे, खोट्या जाहिरातींवर कारवाई करणे आणि सेवा निकृष्ट असल्यास दंडात्मक उपाय करणे ही काळाची गरज आहे. ५ जी हे नावापुरते न राहता ते प्रत्यक्षात अनुभवता आले, तरच डिजिटल भारताचा दावा सार्थ ठरेल. अन्यथा हाय-स्पीड इंटरनेट हे केवळ पोस्टर आणि जाहिरातीपुरते मर्यादित राहील. ग्राहक केवळ महसुलाचे साधन नाहीत, तर ते या डिजिटल व्यवस्थेचा कणा आहेत ही जाणीव मोबाईल कंपन्यांनी आणि यंत्रणांनी ठेवणे आता अपरिहार्य झाले आहे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

## विचार, वाणी व वर्तन

एकदा राजा विक्रमादित्य आपल्या मंत्री आणि सैनिकांसह जंगलात शिकारीसाठी गेला असता जंगलात ते सर्व एकमेकांपासून वेगळे झाले. विक्रमादित्य भटकत असताना त्याला एका झाडाखाली एक आंधळा साधू बसलेला दिसला. याच्याशी विचारपूस करावी या हेतूने विक्रमादित्य पुढे झाला व त्याने विचारले, "हे साधू महाराज, येथून कोणी पुढे गेले का?" त्यावर तो साधू उत्तरला, "राजा, मी तर आंधळा आहे, पण सांगतो! पहिले आपला सेवक इथे आला होता. मग सेनापती व त्यानंतर मंत्री." आंधळ्या साधूच्या उत्तराने विक्रमादित्याला आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "महाराज, आपणाला दिसत नाही, मग आपण मला तसेच इतरांना कसे ओळखले?"

त्यावर साधू उत्तरला, "राजा, मी त्या तिघांचे आणि तुझे मला उद्देशून केलेले बोलणे ऐकले आणि त्यावरून अंदाज बांधला. सर्वप्रथम तुझा शिपाई येथे येऊन मला म्हणाला, काय रे गोसावड्या, इथे कोणी आलं होतं का? त्याला मी आंधळा असल्याचे सांगितले, तसा तो म्हणाला! आंधळा आहे पण बहिरा नाही नां! कानोसा तर घेता आला असतां नां!

थोड्या वेळाने सेनापती आला व विचारले, हे भल्या माणसा, इथे कोणी आलं होतं का ? त्यानंतर आलेल्या मंत्र्यानं मला विचारलं, हे साधूजी, आपण आमच्या राजेसाहेबांना पाहिलं का? आणि शेवटी तुम्ही स्वतः येऊन मला मृदू भाषेत विचारलं की, येथून कोणी पुढे गेलं का? असे बोलणारा प्रजापालक राजाच असू शकतो, हे मी जाणले! राजन, प्रत्येक व्यक्तीची वाणी त्याची पद, प्रतिष्ठा आणि मोठेपणा दर्शविते." एवढे बोलून साधू महाराज पुन्हा ध्यानस्थ झाले.

प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले (स्वाध्याय परिवाराचे प्रणेते) हे त्यांच्या प्रवचनाद्वारे कथास्वरूपात दृष्टांत देऊन एखादा मोठा जीवन सिद्धांतच सहजपणे समजावून सांगतात. खरेच आहे! विचार चांगले असतील तर, (भाषा) वाणी गोड राहील आणि परिणामस्वरूप (वागणूकही) वर्तन संभाविताप्रमाणे अर्थात चांगलेच राहील.

**मधुकर व्यवहारे**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# अंबाजोगाई ग्रासलॅड सफारीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**



बीड वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्र कार्यालय परळी मध्ये जैवविविधता संवर्धन व रोजगार निर्मिती या उद्देशाच्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरालगत असलेल्या वन विभागाच्या डोंगराळ, खुरट्या व गवताळ वनक्षेत्रात अंबाजोगाई ग्रॅसलँड सफारी या उपक्रमाची दिनांक २६. १. २०२६ रोजी विधानसभेच्या सदस्या नमिता मुंदडा अंबाजोगाई, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, विभागीय वनाधिकारी अमोल गरकळ, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण श्रीनिवास लखमावार, अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे, अंबाजोगाई तहसीलदार विलास तरांगे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी वनक्षेत्रात महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सोलापूर येथील ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

परळी वनपरिक्षेत्रा अंतर्गत अंबाजोगाई शहरालगत वन विभागाचे एकूण १३२८.०६ हे.आर सलग राखीव नक्षत्र आहे. सदरचे क्षेत्र हे डोंगराळ खुरट्या व गवताळ प्रकारचे आहे यामध्ये विविध प्रकारचे वन्यप्राणी जसे की हरिण, लांडगा, कोल्हा, बीबट, तडस इत्यादी प्राण्यांचा तसेच विविध प्रकारच्या पक्षांचा अधिवास मोठ्या प्रमाणावर आहे.तसेच या क्षेत्रामधून वाणा नदीचा प्रवाह वाहत असल्यामुळे वन्य प्राणी व पक्षांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था या ठिकाणी आहे. तसेच अंबाजोगाईच्या मुकुंदराज परिसराला निसर्गाची देण आहे.दऱ्या- खोऱ्याने नटलेल्या या परिसरात निसर्ग सौंदर्याचे वैभव दाटलेले आहे. त्यात वनराई फुलण्याची गरज आहे. या परिसराला ऐतिहासिक महत्त्व असून सदरचे ठिकाण हे पर्यटनाच्या दृष्टीने योग्य असल्याने निसर्गरम्य परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून या ठिकाणी ३३ काळवीट ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे.

सदरच्या ग्रॅसलँड सफारीचा प्रकल्प मराठवाड्यासारख्या डोंगराळ भागात पहिलाच प्रयोग असून या प्रकल्पातुन जैवविविधतता वाढवणे तसेच वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा हेतू आहे. सदर प्रकल्प राबवल्यामुळे प्रकल्प क्षेत्रामध्ये विविध गवत प्रजातीची लागवड करून त्या ठिकाणी वन्य प्राण्यांना पानवठे निर्माण करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे जंगलातील प्राणी जंगलातच राहतील आणि पर्यायाने जंगल शेजारील शेतकऱ्याच्या शेतातील पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान होणार नाही.

तसेच या क्षेत्रालगत मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराजांचे समाधी मंदिर, जोगेश्वरी देवीचे मंदिर, संत दासोपंत यांची समाधी, बुट्टेनाथ मंदिर, किरमानी दर्गा, मौलाली दर्गा, हत्तीखाना, बाराखांबी मंदिर लेणी, आकर्षक नृत्य असलेले संकलेश्वर मंदिर, जैन लेण्या तसेच परळी येथे बारा ज्योतिर्लिंग पैकी असलेले प्रभू श्री वैद्यनाथ महादेवाचे मंदिर इत्यादी धार्मिक तसेच ऐतिहासिक मंदिर व वास्तू असल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांची संख्या अधिक असल्यामुळे या सफारीचा निश्चितच पर्यटकांना लाभ होईल तसेच स्थानिक लोकांना यापासून रोजगार निर्मिती सुध्दा होईल असे विभागीय वन अधिकारी (प्रा.) बीड यांनी नमूद केले आहे.

# येडेश्वरी कारखाना परिसरात अजित दादांचे भव्य स्मारक उभारणार

## खा.बजरंग सोनवणे यांची घोषणा

## जिल्ह्याची सिस्टीम बदलण्यासाठी दादाच पालकमंत्री हवे होते

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.६ फेब्रुवारी**



येडेश्वरी साखर कारखाना परिसरात दिवंगत लोकनेते अजित पवार यांचे भव्य व दिव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याची घोषणा बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. येडेश्वरी साखर कारखाना येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते माध्यमांशी बोलत होते.

यावेळी राष्ट्रवादीचे नेते ज्ञानेश्वर चौरे, अमर देशमूख यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अजित दादा हे माझे राजकीय वडील होते. १९९२ पासून त्यांच्याशी माझा संबंध आला आणि १९९९ पासून माझी राजकीय घडण सुरू झाली. माझ्या संपूर्ण राजकीय प्रवासात दादांचे मोलाचे योगदान असून, त्यांच्या जाण्याने राजकीय छत्र हरपले आहे. देशासह महाराष्ट्राची मोठी हानी त्यांच्या जाण्याने झाली असून, त्यांची पोकळी कधीही भरून निघू शकणार नाही, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. येडेश्वरी साखर कारखाना उभारण्यात अजित पवार यांचा मोठा वाटा असल्याचे नमूद करत, त्यांच्या स्मरणार्थ कारखान्याच्या प्रांगणात स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सोनवणे यांनी सांगितले. या स्मारकासाठी २१ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली असून, आपण स्वत: त्या समितीचे सदस्य असणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारखान्यात सध्या सुमारे १८०० कर्मचारी, जवळपास ७ हजार कामगार कार्यरत असून, त्यांच्या सहभागातून हे स्मारक उभारण्यात येणार आहे. पुढील एक वर्षाच्या आत स्मारक पूर्ण करून प्रथम पुण्यतिथीच्या कालावधीत लोकार्पण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.अजित पवार यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेतला होता. मात्र दादा आपल्यातून गेल्याने जिल्हा पुन्हा एकदा पोरका झाला असून, हे बीडचे दुर्दैव आहे. त्यांचे सामाजिक कार्य अतिशय व्यापक होते, असेही सोनवणे यांनी नमूद केले.

**विलीनीकरणावर योग्यवेळी बोलू**

दोन राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांवर बोलताना, सध्या यावर बोलणे योग्य नसल्याचे सांगत, योग्य वेळ आल्यावर आपली भूमिका स्पष्ट करू, असे त्यांनी सूचक विधान केले. दादांच्या निधनाचे दु:ख मनातून असल्याने दहा दिवसांचा दुखवटा पाळला असून, याच कारणामुळे अर्थसंकल्पावरही भाष्य केले नसल्याचे त्यांनी सांगितले.

**हायस्पीड रेल्वेसाठी प्रयत्नशील**

रेल्वे विकासाबाबत बोलताना, बीड जिल्ह्यात रेल्वेचे जाळे वाढवून परळीपर्यंत हायस्पीड रेल्वे आणण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. हे अजित पवार यांचेही स्वप्न होते; ते असते तर हे काम अधिक लवकर झाले असते, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

**विमान अपघाताची चौकशी व्हावी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत संशय व्यक्त करत, या घटनेची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे खा.सोनवणे यांनी सांगितले. विमानतळापासून ते अपघातस्थळापर्यंतचे सर्व सीसीटीव्ही फुटेज जनतेसमोर यावे, तसेच या प्रकरणाची रॉ मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली.

**सिस्टीम बदलण्यासाठी दादा आवश्यक होते**

जरांगे पाटील यांना धमकी देणाऱ्या कॉल रेकॉर्डिंग प्रकरणावर प्रतिक्रिया देताना, हे नीच प्रवृत्तीचे कृत्य असून पाटील हे समाजाच्या हितासाठी काम करणारे पूजनीय व्यक्तिमत्त्व असल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले.बीड जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, जिल्ह्याची सिस्टीम बदलण्यासाठी अजित पवार यांना किमान आणखी दोन वर्षे पालकमंत्री म्हणून राहणे आवश्यक होतड़आजही गुंडगिरी पूर्णपणे कमी झालेली नाही; एखाद-दुसरा अधिकारी बदलून जिल्हा सुधारत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

# श्रीक्षेत्र दत्त मंदिराला जाण्यासाठी पायऱ्यांचे बांधकाम पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**



बीड तालुक्यातील पाटोदा बेलखंडी येथील टेकडीवरील श्री दत्त मंदिराला जाण्यासाठी सिमेंट काँक्रीट पायऱ्यांचे बांधकाम ग्रीलसह पूर्ण झाले असून, दि. ९ फेब्रुवारी सोमवार रोजी सकाळी ९.३० वाजता महंत श्रीधर दादा जामोदेकर व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन योगेश बडगे यांनी केले आहे.

पाटोदा बेलखंडी शिवारातील दत्तनगर येथील उंच टेकडीवर प्रभू श्रीदत्त व भगवान गोपाल कृष्ण यांचे मंदिर अनेक वर्षापासून डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. पंचक्रोशीतील भाविक भक्तांची दर्शनासाठी आणि अध्यात्मिक कार्यक्रमासाठी नेहमीच वर्दळ असते.३१ व्या अखंड नामस्मरण सोहळा निमित्ताने राजेंद्र मस्के यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी महंत श्रीधर दादा जामोदेकर यांनी मंदिरावर जाण्यासाठी पायऱ्याची व्यवस्था करावी असा शब्द टाकला होता.

अबालवृद्ध भाविक भक्तांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन महाराजांच्या सूचने प्रमाणे राजेंद्र मस्के यांनी अवघ्या एक महिन्यात श्री दत्त मंदिरावर जाण्यासाठी सिमेंट काँक्रीट पायरी व ग्रीलचे बांधकाम रंगरंगोटीसह पूर्ण केले आहे. राजेंद्र मस्के यांनी महाराज व ग्रामस्थांचा शब्द पाळला असून त्यांच्या या पुढाकारामुळे ग्रामस्थ समाधानी झाले आहेत.या पायरी कामाचा लोकार्पण सोहळ्या प्रसंगी ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## बीडची भावना ठरलेल्या चंपावती महोत्सवास गरज पडल्यास शिवसंग्रामचा खंबीर पाठिंबा- ज्योतीताई मेटे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध कला प्रकारांचे एकत्रीकरण असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेची सध्या बीड जिल्ह्यात सकारात्मक चर्चा सुरू आहे. या महोत्सवामागे कलेसाठीची निष्ठा, बालकलाकारांच्या प्रोत्साहनाची धडपड आणि बीडच्या समृद्ध कलाक्षेत्रासाठी असलेली तळमळ स्पष्टपणे दिसून येत आहे. बीड रंगभूमीवर अनिलदादा जगताप यांनी उभारलेला चंपावती महोत्सव अल्पावधीतच बीड जिल्ह्याची भावना बनला असून, दरवर्षी हजारो बालकलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग या महोत्सवात पाहायला मिळत आहे.

# स्व.अजित दादांच्या निधनामुळे शिवजयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर आयोजित सांस्कृतिक रद्द करण्यात आला आहे. यावेळी अत्यंत साधेपणाने दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार साहेब यांच्या आकस्मिक आणि दुर्दैवी निधनामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान सकाळी ७:०० वा. शासकीय महापूजा आणि छत्रपती शिवरायांच्या विचारांना अभिवादन करून त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याच्या संकल्पासह साधेपणाने साजरी करण्यात येणार असल्याचे समितीकडून सांगण्यात आले आहे.

गेल्या ३० वर्षांपासून बीड शहरात, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहराच्या पुढाकारातून आणि आयोजनातून डीजेमुक्त सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आदर्श शिवजयंती साजरी केली जाते. सालाबादप्रमाणे यंदाही जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दुःखद पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, यावर्षी शिवजयंती कोणतेही जल्लोषी कार्यक्रम न करता साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

**परंपरेप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते होणार शासकीय महापूजा**

परंपरेप्रमाणे सकाळी ७:०० वा. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहरचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी तसेच विविध मान्यवर यांच्या हस्ते शासकीय महापूजा आणि अभिवादन करून साधेपणाने शिवजयंती साजरी केली जाणार आहे.

# तुलसी कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा 'निरोप समारंभ' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

निरोप समारंभाकडे केवळ एक निरोप म्हणून न पाहता, त्याकडे 'रोप समारंभ' म्हणून पाहावे. इथून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी महाविद्यालयाच्या संस्कारांचे एक रोप आहे, जे समाजाच्या विविध क्षेत्रांत जाऊन या संस्कारांचे रोपण करेल, असे प्रेरणादायी प्रतिपादन तुलसी नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत यांनी केले.

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथे बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी गुरुवार (दि.५) रोजी आयोजित निरोप समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश ढोकणे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, प्रा.संजय खाडे, डॉ.विकास वाघमारे आणि आयु.माधुरी घुंबरे यांची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. राऊत पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये साधारणपणे तीन प्रकार आढळतात. काही विद्यार्थी अत्यंत हुशार असतात, काही मध्यम स्तरातील असतात, तर काही विद्यार्थी अभ्यासात मागे राहणारे असतात. मात्र, यश केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नसून मेहनत, सातत्य आणि योग्य दिशेने केलेले प्रयत्न यावर अवलंबून असते. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही गुण दडलेले असतात. त्या गुणांची ओळख करून त्यावर सातत्याने मेहनत घेतल्यास प्रत्येक विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होऊ शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# भटक्या कुत्र्यांचा उपद्रव रोखा; अन्यथा २० फेब्रुवारीपासून नगरपालिकेच्या दारात आंदोलन - शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

बीड शहरात वाढलेल्या भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाप्रमुख कामरान खान (एकनाथ शिंदे गट) यांनी केली आहे. अन्यथा दि. २० फेब्रुवारी २०२६ पासून बीड नगरपालिकेच्या दारात आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.

शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांनी लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांवर हल्ले केल्याच्या घटना वाढल्या असून, अनेक ठिकाणी नागरिकांना चावा घेऊन गंभीर जखमा झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस नागरिकांमध्ये भीती वाढत आहे.

राज्यात भटक्या कुत्र्यांकडून चावा घेण्याच्या घटनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून, अशा कुत्र्यांची नसबंदी करणे व रेबीज विरोधी लस देणे याबाबत केंद्र सरकारच्या स्पष्ट मार्गदर्शक सूचना आहेत. या सूचनांच्या चौकटीत राहून कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी राज्यात विशेष मोहीम राबविण्याचा सकारात्मक निर्णय घेतला जाईल तसेच यासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी दि. १२ जुलै २०२५ रोजी जाहीर केले होते.

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भटक्या श्वानांची नसबंदी केल्यानंतर त्यांना ज्या ठिकाणाहून पकडण्यात आले, त्याच ठिकाणी पुन्हा सोडणे बंधनकारक आहे. यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आपल्या स्तरावर निविदा काढून उपाययोजना करतात. मात्र बीड शहरासह परिसरात ही समस्या गंभीर स्वरूप धारण करत असल्याने, बीड नगरपालिकेने याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे असल्याचे खान यांनी स्पष्ट केले.

नगरपालिकेने त्वरित ठोस पावले उचलली नाहीत, तर आंदोलन अटळ राहील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

# बिगरव्यावसायीक व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

जिल्हयातील इमाव ओबीसी,विमाप्र,एसबीसी आणि विजाभज व्हीजीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता १२ वी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायीक/ व्यावसायीक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी अर्ज सादर करण्याची मुदत २६.१०.२०२५ पर्यंत देण्यात आली होती. या योजनांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता सदर योजनांना १२ वी नंतरच्या उच्चशिक्षणासाठी बिगरव्यावसायीक व्यावसायिक अभ्यासक्रमास दि. ६ फेब्रुवारी २०२६ पासून दि. १५ फेब्रुवारी पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

तरी विद्यार्थ्यांनी https/// hmas.mahait.org या पोर्टलवर वर ऑनलाईन अर्ज करुन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन इतर मागास बहूजन कल्यानचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

बीड नगरपरिषद हद्दीपासून १० कि.मी. अंतरामधील कॉलेजच्या खीं ूशरी डायरेक्ट, २ पव धशरी ला डमीशन असलेल्या विद्यार्थ्यांनी फक्त वसतीगृह योजनेसाठी अर्जकरावा. बीड तालुक्या व्यतिरिक्त बाकी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी फक्त आधार व स्वयंत योजनेसाठी अर्ज करावा.

# परळी नगरपालिकेने महाशिवरात्री यात्रोत्सवात व्यापाऱ्यांना अल्प करात सोयी-सुविधा पुरवाव्यात-वैजनाथ माने

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ फेब्रुवारी**

अवघ्या काही दिवसांत महाशिवरात्री पर्वास सुरुवात होत असून, श्रीक्षेत्र ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ या ठिकाणी बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रच नव्हे तर सबंध देशभरातून लाखो भाविक परळी वैजनाथ येथे दाखल होतात. महाशिवरात्रीच्या महापर्व दरम्यान श्री क्षेत्र परळीत शिवभक्तांची मांदियाळी असते. या पार्श्वभूमीवर परळी नगरीत पारंपरिक महाशिवरात्री यात्रोत्सव मोठ्या उत्साहात भरतो. या यात्रेमध्ये अनेक लघु व छोटे व्यापारी आपली दुकाने लावून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मात्र नगरपालिकेकडून आकारण्यात येणारा कर त्यांच्या आर्थिक परिस्थितीच्या तुलनेत जास्त असल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून परळी नगरपालिका प्रशासनाने यात्रोत्सवादरम्यान व्यापाऱ्यांना अल्प करात सोयी सुविधा पुरवण्याची मागणी शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

यासंबंधी परळी वैजनाथ नगरपालिकेच्या प्रशासनास दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, महाशिवरात्री यात्रोत्सवात स्थानिक लघु व्यापाऱ्यांना प्राधान्य देण्यात यावे तसेच जागा भाडे, दिवाबत्ती कर, पाणी, स्वच्छता, वीजपुरवठा आदींसाठी नगरपालिकेकडून आकारण्यात येणारा कर अत्यल्प व वाजवी स्वरूपात ठेवण्यात यावा. आजपर्यंतच्या अनुभवावरून पाहता यात्रेदरम्यान व्यापारण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क अनेक छोट्या व्यावसायिकांना परवडणारे



नसते. त्यामुळे अनेक व्यापारी नुकसान सहन करून व्यवसाय करतात. याचा थेट परिणाम त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेवर होतो.

यात्रोत्सवाच्या काळात व्यापाऱ्यांना आवश्यक सर्व सुविधा सुलभपणे मिळाव्यात यासाठी न.पा. प्रशासनाने एक खिडकी योजना राबविण्याची मागणीही शिवसेनेने केली आहे. या योजनेअंतर्गत नगरपालिका परवानगी, महावितरणकडून वीज जोडणी, पोलीस बंदोबस्त, स्वच्छता, पाणीपुरवठा यासह सर्व परवानग्या एकाच ठिकाणी आणि एकाच छताखाली उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरून व्यापाऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारावे लागणार नाहीत.

महाशिवरात्री दरम्यान परळीत भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षितता, स्वच्छता आदि बाबींचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने स्वतंत्र यंत्रणा उभी करावी. शिवसेनेच्या या सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून तात्काळ कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने, शंकर कापसे, बालाजी सातपुते, युवासेना शहर समन्वयक सुदर्शन यादव शहर संघटक सचिन सोनवणे, अभिषेक औटी, विशाल शिंदे, यशवंत शिंदे, नामदेव कांबळे, अनिकेत माने आदींनी दिला आहे.

# विविध पुरस्कारासाठी अर्ज सादर आमंत्रित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ फेब्रुवारी**

इतर मागास बहुजन विभागामार्फत राबविण्यात येणा-या महात्मा बसवेश्वर सामाजिक समता- शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रंतीवीर उमाजी नाईक पुरस्कार सन २०२५- २६ साठी पुरस्कारासाठी पात्र इच्छुक व्यक्ती तसेच संबंधित समाजाच्या उत्थानासाठी उल्लेखनिय कार्य करणा-या संस्था यांनी दि. ५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुरस्कारासाठी प्रस्ताव सहाय्यक संचालक, इतरमागास बहूजन कल्याण बीड येथे कार्यालयीन वेळेत रितसर सादर करावे.अर्जाचा नमूना शासन निर्णयातील सविस्तर अटी व शर्ती तसेच अधिक माहितीसाठी सहाय्यक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण बीड येथे कार्याजयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन इत्तर मागास बहूजन कल्याणचे सहाय्यक संचालक यांनी केले आहे.

# ध्येय निश्चित करून विद्यार्थ्यांनी त्या दिशेने वाटचाल करावी- गुप्ता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

आपल्या क्षमता आणि कौशल्यानुसार विद्यार्थ्यांनी जीवनात ध्येयनिश्चित करीत त्या दिशेने वाटचाल केल्यास त्यांना जीवनात निश्चित यश मिळते. त्यासाठी सातत्य, परिश्रमासोबतच अभ्यासाची जोड असावी लागते असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

शहरातील शिवाजीराव देशमुख सभागृहात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, सध्याचे युग हे प्रचंड स्पर्धेचे असले तरी विविध क्षेत्रात करियर करण्याची संधी आहे. विद्यार्थ्यांनी आधी त्यांच्या क्षमता ओळखल्या पाहीजेत तसेच कौशल्यानुसार त्याकडे वाटचाल केली पाहीजे. त्यासाठी कठोर परिश्रम आणि सातत्याची आवश्यकता आहे.

स्पर्धा परीक्षांची तयारी करतांना विद्यार्थ्यांनी त्यांच्या आर्थिक, सामाजिक वा इतर कोणत्याही परिस्थितीचा बाऊ करू नये. येणाऱ्या परिस्थितीला खंबीरपणे तोंड देत ध्येयाकडे वाटचाल करण्याची गरज आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग तसेच इतर स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासाचे योग्य नियोजन महत्वाचे असते. या सोबतच प्रश्नपत्रिका सोडवितांना वेळेचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. याशिवाय अभ्यासात सातत्य ठेवून विविध पुस्तकांमधून अभ्यास करतांना चालू घडामोडींची माहीती ठेवली पाहीजे.

पहिल्या प्रयत्नात अपयश आले तरीही खचून न जाता अपयश ही यशाची पहिली पायरी आहे हे लक्षात ठेवून नव्या उमेदीने अभ्यासाला लागावे. गटचर्चाच्या माध्यमातून कठीण वाटणारे विषय अभ्यासावेत. केवळ पुस्तकी ज्ञान असण्यापेक्षा लोकसंपर्क, गटचर्चा देखील महत्वाची आहे.

यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना देखील जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी उत्तरे देत विद्यार्थ्यांचे समाधान केले. तसेच पुढील काळात केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग व इतर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केले जाईल तसेच मुलाखतीची तयारीही करून घेतली जाईल असे आश्वासन जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले. यावेळी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच पालक यांची उपस्थिती होती.

# सीईओंच्याहस्ते आशा स्वयंसेविकांना पुरस्काराचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते येथील नक्षत्र सभागृहात आज जिल्हास्तरीय उत्कृष्ट आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक पुरस्कार वितरण करण्यात आले.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदीप काळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. शंकर तावडे, जिल्हा समूह संघटक अजहर अली आदी उपस्थित होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणात आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांशी संवाद साधत गावपातळीवर आरोग्य सेवा देताना प्रामाणिकपणे व स्पर्धात्मक भावनेने काम केल्यास त्याचे निश्चित फळ मिळते, असे सांगून आज मिळालेला सन्मान हा त्यांच्या कार्याची खरी पावती असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गायकवाड यांनी सांगितले. तसेच हिंगोली तालुका सध्या आकांक्षित तालुक्यात असल्याने येत्या सहा महिन्यांत सकारात्मक प्रयत्न करून तो आकांक्षित यादीतून बाहेर काढण्याचे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून धन्वंतरीच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी केले. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते पुरस्कार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

जिल्हास्तरीय सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्कार भांडेगाव येथील श्रीमती भाग्यरथा शिवाजी शिखरे यांना ५००० रुपये रोख प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. तर मासोड येथील श्रीमती मुक्ता शेकुराव खुडे व्दितीय (३००० रुपये), सिद्धार्थनगर येथील श्रीमती आशा गजानन कोरडे तृतीय (२००० रुपये रोख) क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. तर तालुकास्तरीय सर्वोत्कृष्ट आशा स्वयंसेविका पुरस्कार पिंपळदरी येथील श्रीमती वंदना गजानन लेकुळे, प्रथम, पिंपळदरी येथील श्रीमती वैशाली गणेश ढगे, द्वितीय तर जवळा बाजार येथील श्रीमती अर्चना बापूराव दिपके तृतीय असा अनुक्रमे तीन, दोन आणि एक हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कुरुंदा येथील श्रीमती निता भारत गायकवाड प्रथम, गिरगाव येथील श्रीमती प्रेमिला गजानन रानखांब द्वितीय तर कुरुंदा येथील श्रीमती भारती रमेश गायकवाड यांना तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. नर्सी येथील श्रीमती प्रणाली प्रल्हाद खिलारे प्रथम, भांडेगाव येथील श्रीमती अनिता अशोक जळके द्वितीय तर नर्सी येथील श्रीमती नीता प्रदीप जयस्वाल यांना तृतीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. डोंगरकडा येथील श्रीमती कविता दयानंद थोरात प्रथम, वाकोडी येथील श्रीमती पद्मिना सोपान पाईकराव द्वितीय तर आखाडा बाळापूर येथील श्रीमती शोभा गणेश तोरकड तृतीय क्रमांक मिळाला. साखरा येथीलच श्रीमती सुचिता शामराव पांडे, प्रथम, श्रीमती सीमा रेणुकादास पांडे द्वितीय आणि श्रीमती शारदा राहुल वाघमारे यांनी क्रमांकाचा पुरस्कार पटकावला.

जिल्हास्तरीय गट प्रवर्तक पुरस्कार आखाडा बाळापूर येथील श्रीमती रेणुका दिवाकर देशपांडे प्रथम क्रमांकाचा, शिरडशहापूर येथील श्रीमती प्रणिता दिलीपराव काळे द्वितीय तर कुरुंदा येथील श्रीमती शांता संजय गायकवाड तृतीय क्रमांकाचा अनुक्रमे अडीच हजार, दीड हजार आणि एक हजार रुपये रोख पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. सतीश रुणवाल यांनी केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे यांनी आशा वर्कर या गावपातळीवरील आरोग्य व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे नमूद करून या पुरस्कारामुळे कामाची नवी प्रेरणा मिळते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समूल्यांकन अधिकारी अमोल कुलकर्णी, तालुका समूह संघटक बापू सूर्यवंशी, ओंकार जोशी, मारोती सोलापरे, अशोक चव्हाण व शिवानंद स्वामी यांनी परिश्रम घेतले.

# कयाधूवरील बंधारा तोड, पूरमुक्ती की सिंचनावर घाला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

कयाधू नदीवरील खरबी बंधाऱ्याचा वाद ताजा असतानाच, आता कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर शिवारात पूर्वी बांधण्यात आलेला बंधारा युद्धपातळीवर पाडण्याचे काम सुरू झाल्याने जिल्ह्यात नव्या वादाला तोंड फुटले आहे. एकीकडे या बंधाऱ्यामुळे डोंगरगाव पूल गावाला दरवर्षी पुराचा वेढा बसत असल्याचा दावा करून तोड करण्यात येत असताना, दुसरीकडे माजी खासदार अ‍ॅड. शिवाजी माने यांनी या निर्णयाला तीव्र विरोध करत जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून होणारा खर्चच चुकीचा असल्याचा आरोप केला आहे.

डोंगरगाव पूल गावालगतच्या जुन्या रस्त्यावर काही वर्षांपूर्वी दरवाजे बसवून हा बंधारा उभारण्यात आला होता. प्रारंभी या बंधाऱ्यामुळे पाणी साठवण होऊन आसपासच्या दोन ते तीन गावांतील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळाला. मात्र, कयाधू नदीला पूर आला की गावाला चारही बाजूंनी पाण्याचा वेढा बसत असल्याचे चित्र वारंवार निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर सरपंच गजानन देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा करत पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचे लक्ष वेधले. आमदार संतोष बांगर यांच्या सूचनेनंतर आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बंधारा पाडण्यास मंजुरी देण्यात आली.

जिल्हा नियोजन समितीतून निधी मंजूर होऊन कंत्राटदाराला काम देण्यात आल्याने सध्या बंधारा पाडण्याचे काम सुरू आहे. यामुळे येणाऱ्या पावसाळ्यात डोंगरगाव पूल गाव पुराच्या धोक्यापासून मुक्त होईल, असा दावा ग्राम पंचायतीकडून करण्यात येत आहे.

मात्र,माजी खासदार शिवाजी माने यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून या निर्णयाला कडाडून विरोध दर्शविला आहे. गाव डोंगरावर वसलेले असताना पुराचा धोका नसल्याचा दावा करत, बंधारा तोडल्यास सिंचन पूर्णपणे बंद होईल आणि कयाधू नदीतील पाणी वाहून जाऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे हा बंधारा पाडण्याच्या कामाला तातडीने स्थगिती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

पूरमुक्ती आणि सिंचन यांमधील हा संघर्ष आता जिल्ह्यातील राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सोडेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

हिंगोली- कळमनुरी तालुक्यातील श्रीक्षेत्र सोडेगाव येथे श्री संत भोलागिरी महाराज यांच्या ६२ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह तसेच श्रीमद् भागवत कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भक्तिभावपूर्ण वातावरणात संपन्न होत आहे. दि. ०७ फेब्रुवारी शनिवार ते १४ शनिवार फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली आहे. या सप्ताहात दररोज सकाळी ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ६ ते ९ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ९ ते १० गाथा भजन, सकाळी दहा ते अकरा भोजन, दुपारी एक ते चार भागवत कथा, दुपारी ४.३० ते ६.३० हरिपाठ, सायंकाळी ६.३० ते ८ भोजन व रात्री हरीकीर्तन व नंतर हरिजागर होईल असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सोहळ्यात श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. गजानन महाराज कळमनुरीकर तसेच ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ संचालक ह.भ.प. विठ्ठलराव महाराज आहेर यांचे लाभत आहे. या सप्ताह मध्ये सकाळ आणि सायंकाळी अन्नदान रुपी भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे त्यामध्ये पांडुरंगराव बाबाराव निळकंठे, अंकुश शंकरराव बेले, शिवाजीराव व्यंकटराव निळकंठे, साहेबराव देवराव निळकंठे,सुनीलराव विनायकराव देशमुख, बाबाराव शंकरराव निळकंठे, लक्ष्मणराव गणपतराव पाटील, ओम दीपकराव पाटील, गणेशराव अमृतराव निळकंठे, प्रतापराव बापूराव निळकंठे, गणेशराव लक्ष्मणराव निळकंठे, गजाननराव बालासाहेब निळकंठे, गजाननराव पुंडलिकराव निळकंठे,शेषराव किशनराव निळकंठे, अनिलराव माधवराव निळकंठे या सर्व अन्नदात्याकडून भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे. या अखंड हरिनाम सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री संत भोलागिरी महाराज भक्तवृंद, सोडेगाव तसेच ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

### डी एल एड परीक्षेचा निकाल जाहीर

हिंगोली- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत डी.एल.एड्. डिसेंबर-२०२५ परीक्षेचे आयोजन दिनांक ९ ते १७ डिसेंबर, २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या परीक्षेचा निकाल आज दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला आहे. परीक्षार्थींना निकालाचे मूळ गुणपत्रक संबंधित अध्यापक विद्यालयामार्फत यथावकाश हस्तपोच मिळणार आहे. तसेच उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणी करण्यासाठी विहित नमुन्यात, विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ अशी राहील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांनी दिली आहे.

### ३८ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३८ वाहन चालकाविरूध्द पोलिसांनी जिल्ह्यात विविध ठिकाणी कार्यवाही करीत वाहन चालकांकडून ३९ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत दोन ठिकाणी पोलिसांनी कारवाई करीत २४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत. तर जुगार कायद्यांतर्गत जिल्ह्यात ४ ठिकाणी छापे मारून आरोपीतांकडून २८०६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत गुन्हे दाखल केले आहेत.

# हिंगोलीत शिवजयंती महोत्सवानिमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन, पत्रकार संघाचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

येथील शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे त्याचेच औचित्य साधून ११ फेब्रुवारी बुधवार रोजी सार्वजनिक शिवजयंती आयोजित पत्रकार संघाच्या वतीने रामलीला मैदानावर सकाळी ६.३० वाजता क्रिकेट लिग स्पर्धेला सुरुवात होणार असून त्याची जयत तयारी सुरू आहे. शहरातील रामलीला मैदानावर शिवजयंती समितीच्या वतीने भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, मैदानातील विजेच्या खांबांमुळे खेळाडूंना अडथळा येत होता. शिवजयंती समितीच्या मागणीची दखल घेत महावितरणने तत्परतेने हे पोल काढण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच पत्रकार संघाच्या वतीने देखील राम कदम मित्रमंडळाच्या पदाधिकाऱ्यांची भेट देऊन मैदानाच्या व्यवस्थे संदर्भात विनंती करण्यात आली होती त्यांनी देखील मैदान व्यवस्थित करुन देण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व जिल्हा पोलीस अधिक्षक निलाभ रोहन यांच्या हस्ते होणार आहे. या स्पर्धेत महसूल विभाग, नगर परिषद विभाग, पोलीस विभाग, महावितरण, पत्रकार संघ, वकील संघ, वकील संघ, व्यापारी महासंघ, डॉक्टर संघ, आरोग्य विभाग संघ, एसआरपीएफ सघ्र, सा. बां. विभाग संघ, फॉरेस्ट संघ, केमीस्ट संघ, पत्रकार बी संघ, शिक्षण विभाग संघ सहभागी होणार आहेत. अधिक माहितीसाठी शिवाजी मेटकर व राकेश भट्ट, सुनील पाठक यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. स्पर्धेचे आयोजन पत्रकार संघाचे प्रद्युम्न गिरीकर, प्रसाद आर्वीकर, विजय पाटील, दिलीप हळदे, हरपालसिंग सेठी, प्रितम राठोड, सुमित कान्हेड, रमेश वाबळे, सुनील नागरे, विजय गुंडेकर, गोपालराव सरनायक, सुधाकर वाढवे, सुधीर गोगटे, मदन शेळके, प्रकाश इंगोले, संतोष आठवले, चंद्रकांत वैद्य, निलेश गरवारे, बाबा ढोकणे हे आहेत. या सामन्यांचा लाभ घेण्याचे आवाहन सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षा सुनिता मुळे, उपाध्यक्षा विद्या पवार, सचिव रजनी पाटील, कार्याध्यक्षा स्वाती भोयर, कोषाध्यक्षा कांताबाई कल्याणकर यांनी केले आहे.

# सराफा व्यापाऱ्यांकडून पोलिस अधीक्षकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

सेनगाव तालुक्यातील महामार्गावर एका सराफा व्यापाऱ्याकडून चाकुचा धाक दाखवून ३० लाखांचा ऐवज लुटून दरोडेखोर पसार झाले होते. या गुन्ह्यातील आरोपींना स्थानिक गुन्हे शाखा, सेनगाव पोलिसांनी ४८ तासांच्या आत जेरबंद करीत त्यांच्याकडून ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे लोणार येथील सराफा असोसिएशनच्यावतीने पोलिस अधीक्षक निलाभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांचा सत्कार हिंगोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात करण्यात आला. सराफा असोसिएशनचे विजय इरवरकर, गोपाळ डहाळे, प्रमोद खंदारकर, प्रवीण खंदारकर, सत्यनारायण खंदारकर, धीरज खंदारकर, रामदास इंगोले, नारायण शिंदे, सुरेश खंदारकर, यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले, सपोनि शिवसांब घेवारे, उपनि दिलीप मोरे, माधव जिव्हारे यांची उपस्थिती होती.

# कृषी विभागाच्यावतीने क्रिडा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

कृषी विभाग जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंगोली द्वारा आयोजित जिल्हा क्रीडा महोत्सवचे उद्घाटन दिनांक ६ फेब्रुवारी रोजी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी राजेंद्र कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून एस.आर.पी.एफचे समादेशक विक्रम साळी, जिल्हा कृषी अधिकारी अतुल वायसे, सहाय्यक समादेशक, आर.बी. दामनवाड, प्रकल्प उपसंचालक आर्चना गुंजकर, प्रदीप कच्छवे, प्रसाद हजारे, गोविंद बंटेवाड, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

हिंगोली, वसमत, सेनगाव, कुळमनुरी तालुका कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने क्रीडा स्पर्धेत सहभागी झाले होते. ६ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी जिल्हा क्रीडा स्तरीय स्पर्धा घेण्यात येणार आहेत तर ८ फेब्रुवारी रोज रविवारी दुपारी ४ वाजता बक्षीस वितरणाचा कार्यक्रम बक्षीस वितरणाचा आयोजित करण्यात आला आहे.

६ फेब्रुवारी रोजी विविध विभागांच्या वतीने कृषी दिंडी, शेतकऱ्यांची दिंडी, वारकरी पायी दिंडी काढण्यात आली. कृषी विभागाच्यावतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात कलाकारांनी अत्यंत प्रभावीपणे नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रसाद हजारे यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी तसेच सामान्य नागरिकांची उपस्थिती होती.

# महिला मंडळ अधिकाऱ्यास जीवे मारण्याची धमकी देत टिप्पर पळविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ फेब्रुवारी**

वसमत येथील बसस्थानकाजवळ अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर थांबविल्यानंतर तहसील कार्यालयात नेत असतांना महिला मंडळ अधिकाऱ्यास जीवे मारण्याची धमकी देऊन टिप्पर पळविल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी चौघांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी वसमत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली जिल्ह्यात अवैध वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागासह पोलिस विभागानेही कंबर कसली आहे. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचय मार्गदर्शनाखाली महसूल विभागाचे तर पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस विभागाची पथके स्थापन करण्यात आली असून जिल्हाभरात अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. या पथकामार्फत वाळू घाटांवरील मार्गावर थांबून वाहनांची तपासणी केली जात आहे. अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर थेट पोलिस कारवाई केली जात आहे.

वसमत येथे उपविभागीय अधिकारी विकास माने आणि तहसीलदार शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सुप्रीया जिंतूरकर, तलाठी प्रवीण पांडे, प्रियंका खडसे, मोनाली ढगे यांचे पथक गुरूवार दि ५ फेब्रुवारी रोजी गस्तीवर असतांना सदर पथक मध्यरात्रीच्या सुमारास वसमत येथील बसस्थानकाजवळ आले असतांना त्याठिकाणी एक टिप्पर आढळून आले. त्यावरून पथकाने टिप्पर चालकाकडे चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर टिप्परची पाहणी केली असता त्यात वाळू आढळून आली. या प्रकारानंतर मंडळ अधिकारी जिंतूरकर यांनी टिप्पर तहसील कार्यालयात नेण्याची सूचना केल्यानंतर त्याठिकाणी अनिकेत नामपल्ली व इतर दोघे आले. त्यांनी मंडळ अधिकारी जिंतूरकर यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत टिप्पर घेवून निघून गेले. याप्रकरणी मंडळ अधिकारी जिंतूरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून वसमत पोलीस ठाण्यात अनिकेत नामपल्लीसह चौघांवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गो-तस्करीचा पर्दाफाश; रामतीर्थ पोलीसांची कारवाई

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ६ फेब्रूवारी-**

रामतीर्थ पोलीस ठाणे हद्दीत गो-तस्करीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, पोलिसांनी तत्पर आणि धाडसी कारवाई करत तिघा गो-तस्करांना अटक केली आहे. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून रामतीर्थ पोलिसांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ५.२२ वाजता नरसी ते बिलोली मार्गावर मध्यवर्ती बँकेसमोर असलेल्या राज्य महामार्गाच्या दुभाजकावर एक गाय रवंथ करत उभी असल्याचे आढळून आले. मात्र तिचे वासरू जवळ नसल्याने संशय बळावला. चौकशीत अज्ञात चोरट्यांनी वासराला जबरदस्तीने कारमध्ये कोंबून पळवून नेल्याचे निष्पन्न झाले. वासरापासून दूर झाल्याने गाईची अवस्था अत्यंत हळहळजनक होती.

याबाबत माहिती मिळताच रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे रामतीर्थ पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने जलद हालचाली करत आरोपींचा शोध घेतला.

या प्रकरणी रामतीर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गो-तस्करी व चोरी करणारे आरोपी मोहम्मद अजीम मोहम्मद सिराज (रा. नांदेड), शेख आश्रम पिता शकील (रा. मनोर, ता. मनोर, जि. पालघर) आणि आयुब खान (रा. मुंब्रा, जि. ठाणे) यांना अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली दणत कार पोलिसांनी जप्त केली आहे.

पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या यशस्वी कारवाईमुळे गो-तस्करी विरोधात पोलिसांचा कडक इशारा मिळाला असून सध्या सर्व आरोपी पोलीस कोठडीत आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# एफएमजीई पात्रता परीक्षेत वैष्णवीचे घवघवीत यश

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ६ फेब्रूवारी-**

एनबीईएमएसद्वारे घेण्यात आलेल्या फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन-एफएमजीई डिसेंबर २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, किर्गिजस्तान येथे एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या माहूर तालुक्यातील आष्टा येथील कु. वैष्णवी गजाननराव सोनटक्के हिने ह्या परीक्षेत ३०० पैकी १९८ गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.या यशामुळे तिचे डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण झाले असून माहूर तालुक्याच्या वैद्यकीय क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. वैष्णवी ही पत्रकार संजय सोनटक्के यांची पुतणी आहे.

एफएमजीई (फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झामिनेशन) ही भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अंतर्गत एक स्वायत्त संस्था असलेल्या व भारतात पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण आणि परीक्षांचे उच्च व एकसमान मानकीकरण करण्याचे काम करणाऱ्या नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस अर्थात 'राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळ' (एनबीईएमएस) द्वारे परदेशातून एमबीबीएस पूर्ण करणाऱ्या भारतीय नागरिक किंवा ओसीआय कार्डधारकांसाठी आयोजित केली जाणारी अनिवार्य पात्रता परीक्षा आहे. ही पात्रता परीक्षा वर्षातून (जून आणि डिसेंबर) संगणक पद्धतीने घेतली जाते.

किर्गिजस्तानमधून एमबीबीएस पूर्ण करणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांसाठी एफएमजीई उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. ३०० पैकी १५० गुण (५०%) मिळवून ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण करणे, भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक आहे. भारतीय नागरिक किंवा ओसीआय कार्डधारक ज्यांनी किर्गिजस्तान किंवा परदेशातून एमबीबीएस पदवी पूर्ण केली आहे हे या पात्रता परीक्षेसाठी पात्र ठरतात.

ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच भारतात डॉक्टर म्हणून प्रॅक्टिस करण्यासाठी परदेशी पदवीधरांना तात्पुरती किंवा कायमस्वरूपी नोंदणी (रजिस्ट्रेशन) मिळते. अशा या महत्त्वाच्या एफएमजीई पात्रता परीक्षेत माहूरच्या आष्टा या खेडेगावातील वैष्णवी हिने यशस्वी होत आष्टा सारख्या ग्रामीण भागातून प्रथम महिला डॉक्टर होण्याचा बहुमान मिळवत वैद्यकीय क्षेत्रात इतिहास घडविला आहे.

वैष्णवी हिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोळा तांडा आष्टा, त्यानंतर दहावीपर्यंत विद्यालयीन शिक्षण हे साखळे विद्यालय, उमरखेड व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण हे श्री शंकरराव चव्हाण विद्यालय आष्टा येथे झाले झाले असून,एमबीबीएसचे वैद्यकीय शिक्षण हे विदेशामध्ये किर्गिजस्तान येथे सप्टेंबर २०२० ते मे २०२५ मध्ये यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. अर्थात परदेशात राहून शिक्षण घेत असताना आर्थिक,

शैक्षणिक व वैयक्तिक अशा अनंत अडचणींचा सामना तीला करावा लागला. अशाही विपरीत परिस्थितीवर मात करून हार न मानता आपले डॉक्टर होण्याचे ध्येय कायम ठेवत एफएमजीई सारख्या कठीण व स्पर्धात्मक परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी तिने दिवस रात्र अभ्यास करून अथक परिश्रम घेऊन पहिल्याच प्रयत्नात ३०० पैकी १९८ गुण घेऊन नेत्रदीपक यश प्राप्त करत आपली व आपल्या आईबाबांसह संपूर्ण सोनटक्के परीवाराची स्वप्नपूर्ती केली आहे.

डॉ.कु.वैष्णवी हिने प्रचंड संघर्ष, जिद्द आणि चिकाटी आणि कठोर परिश्रमातून मिळविलेल्या या यशाबद्दल आष्टासह तालुक्याचे ज्येष्ठ राजकीय नेते नामदेवराव केशवे,बाबाराव केशवे,अनंत केशवे, प्राचार्य राजेंद्र केशवे, डॉ.निरंजन केशवे, वसंतराव पिंगळे,उमाजी कराळे,गोपीनाथ सुरोशे,नगरसेवक प्रा.विलास भंडारे,प्रा.सुजित केशवे, अशोक सोळंके, चेतन कराळे, किरण वंजारे,कोथळकर सर, पावडे सर,प्रा.अजय राठोड, प्रा.प्रशांत कदम,प्रा.तुषार तास्के,प्रा. कोषटवार मॅडम यासह अनेकांनी तीचे अभिनंदन करत पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कितीही कठीण असले तरी वैष्णवी हिने केलेल्या मेहनतीच्या जोरावर यश खेचून आणता येते हे सिद्ध करून दाखविले आहे.हे उच्च शिक्षण घेणाऱ्या तमाम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. माहूर सारख्या जेमतेम वैद्यकीय सेवा सुविधा उपलब्ध असलेल्या आदिवासी बहुल मागासलेल्या भागात एमबीबीएस डॉक्टरची नितांत गरज असून, डॉ. वैष्णवी सोनटक्के यांनी आता माहूर येथेच हॉस्पिटल उभारुन येथील गोरगरिब रुग्णांना आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## दहावी-बारावी परिक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड -** नांदेड जिल्ह्यातील सर्व बारावीच्या ११० तर दहावीच्या १७७ परीक्षा केंद्रापासून १०० मिटरच्या परिसरात १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ रोजीपर्यंत सकाळी ९ ते रात्री ७ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यक्तीरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. याबाबतचा आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन निर्गमीत केला आहे. या आदेशानुसार परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कर्मचारी याव्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅलक्युलेटर, ट्रॅन्झीस्टर, रेडिओ, लॅपटॉप इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या १०० मिटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास, तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास, त्याचप्रमाणे वर दर्शविलेल्या कालावधीत परीक्षा केंद्राच्या परिसरातील १०० मिटर पर्यंतची सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय. एस.डी., भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनीक्षेपक चालू ठेवण्यास याद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे. सर्व संबधीतांना नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे सद्य परिस्थितीत शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश काढण्यात आला आहे.

## अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदानसाठी १० रोजी विशेष कॅम्प: अभिजीत जगताप

**माहूर -**शासनाकडून अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसानीचे अनुदान ई पंचनामा पोर्टल मार्फत पात्र लाभार्थ्यांना वितरीत केले जाते. परंतु मागील दोन ते तीन वर्षाचे अनुदान काही लाभार्थ्यांना मिळाले नसल्याच्या तक्रारी कार्यालयास येत असल्याने दि.१०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तहसील कार्यालय, माहूर येथे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कॅम्पला माहूर तालुक्यातील मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (पूर्वीचे पदनाम तलाठी) उपस्थित राहणार असुन अनुदानासंबंधीच्या तक्रारीचे निवारण करण्यात येणार असल्याने या कॅम्पला ज्या लाभार्थ्यांना सन २०२२ ते २०२५ पर्यंतचे अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदान मिळाले नाही, त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन अभिजीत जगताप तहसीलदार, माहूर यांनी केले आहे.

## शहराच्या आरोग्यासाठी शुद्ध पाणी हीच नगरपरिषदेची प्राथमिकता :शरद पवार

**लोहा-** मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या नेतृत्वात शहरातील नागरिकांना स्वच्छ फिल्टर पाणी पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आसेल असे नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी पाहाणी करता संकल्प केला. शहरातील नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या फिल्टर प्लांटची पाहणी करताना नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, पाणीपुरवठा विभागाचे देशपांडे , गटनेता भास्कर पाटील पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, केतन खिल्लारे, राजू बोडके, सदाशिव तेलंग सह नगरसेवक व अधिकारी यांची उपस्थिती होती.

## शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतीविक्रेत्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**नांदेड -** अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील भूमिहीन, दारिद्ररेषेखालील शेतमजूर कुटूंबाना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेअंतर्गत ४ एकर कोरडवाहू किंवा २ एकर बागायती शेतजमीन उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाने सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत शेतजमीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना कोरडवाहू शेत जमीनीसाठी प्रति एकर ५ लाख रुपये मर्यादेच्या आत तसेच बागायती शेतजमीनीसाठी प्रति एकर ८ लाख रुपये मर्यादेच्या आत जिल्हास्तरीय समितीमार्फत वाटाघाटी करुन मोबदला अदा करण्यात येतो. जिल्ह्यात शेतजमीन विक्री करण्यास इच्छुक असणाऱ्या शेतकरी व व्यक्तीनी आवश्यक कागदपत्रांसह शेतजमीन विक्रीचे प्रस्ताव सादर करावेत. आवश्यक कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्ज, सातबारा उतारा, नमुना आठ-अ, शंभर रुपयांच्या बाँड पेपरवर नोटरी सह विहित नमुन्यातील शपथपत्र, भूमि अभिलेख कार्यालयाचा पोटहिस्सा मोजणी अहवाल, तलाठी यांचे निर्विवाद प्रमाणपत्र, मुल्यांकन प्रमाणपत्र, बँकेचे बेबाकी प्रमाणपत्र, कुटुंबातील सदस्यांचे नाहरकत प्रमाणपत्र, मागील १३ वर्षाचे फेरफार संबंधी पुरावे (सर्च रिपोर्ट), इतर आवश्यक कागदपत्रासह प्रस्ताव तात्काळ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड येथे सादर करावेत. अर्जाचा नमुना, शपथपत्रांचे नमुने व अधिक माहितीसाठी समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

## ई-आर १ त्रैमासिक विवरणपत्र ऑनलाईन भरण्याचे आवाहन

**नांदेड -** जिल्ह्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांच्याकडे आपल्या आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या माहितीबाबतचे माहे डिसेंबर २०२५ अखेरचे ई-आर- १ (एठ-१) त्रैमासिक विवरणपत्र जानेवारी/फेब्रुवारी २०२६ च्या मुदतीत या कार्यालयाचे संकेतस्थळ ु. ारहरीुूरा.सीं.ळप वर भरावयाची मुदत आहे. डिसेंबर- २०२५ अखेरचे ईआर १ (एठ ९) त्रैमासिक विवरणपत्र भरल्याची प्रत माहे जानेवारी २०२६ च्या वेतन देयकसोबत जोडल्याशिवाय वेतन देयके स्विकारली जाणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी. जिल्ह्यातील शासकीय / निमशासकीय कार्यालयांना या कार्यालया मार्फत युजर आयडी व पासवर्ड यापूर्वीच कळविण्यात आलेले आहेत. तसेच सर्व कार्यालयांनी आपले ईमेल आयडी, फोन नंबर, पॅन नंबर, टॅन नंबर नोंदवून आपली प्रोफाईल अद्यावत करावी. या बाबत काही अडचणी आल्यास या कार्यालयाचे दुरध्वनी क्र. ०२४६२-२५१६७४ वर संपर्क करावे, असे आवाहन केले आहे.

# जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनास प्रशिक्षणार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाबरोबरच कौशल्यास वाव मिळावा, नवनवीन संकल्पना, नाविन्यता विकसीत व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनाचे श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये संपूर्ण जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था मिळून जवळपास २४ संस्थानी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमासाठी संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य हर्षदभाई शहा, संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुर्यवंशी एस. व्ही., औ.प्र. संस्था अर्धापूरचे प्राचार्य तथा संस्थेचे उपप्राचार्य कंदलवाड व्ही. डी., प्राचार्य सर्वश्री त्रिचूरकर, फारूकी, गायकवाड, पिंडकुलवार, अन्नपुर्णे पी. के. तसेच जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील संस्थेतील शिल्प निदेशक तथा प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राचार्य सचिन सुर्यवंशी यांनी तंत्रप्रदर्शनासारख्या संकल्पना राबवल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या कौशल्यास वाव मिळतो. सध्याचे युग हे उद्योगाला चालना देणारे तसेच नविन उद्योग धोरण राबवणारे असल्यामुळे नवनविन उद्योजक निर्माण होऊ शकतात. संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य हर्षदभाई शहा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना तंत्रप्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व आधूनिक बदलांशी जुळवून घेणेसाठी त्यांना उदयुक्त करता येते, असे नमूद केले.

तंत्रप्रदर्शनामध्ये प्रशिक्षणार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील आवश्यक असणाऱ्या गोष्टींवर अतिशय नाविन्यपुर्ण संकल्पना आणि तांत्रीक कौशल्यावर आधारीत असे उपकरणे तयार केली. प्रदर्शनाचा लाभ नांदेडमधील विविध शाळांनी घेतला.

कार्यक्रमाचे आभार करताना संस्थेचे उपप्राचार्य व्ही. डी. कंदलवाड यांनी सहभागी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहीत करून त्यांचे कौतूक केले.

# गटई कामगारांसाठी अनुदानावर पत्र्याचे स्टॉल योजनेची व्याप्ती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सन २०२५-२६ करीता सुधारित मागणी नोंदविण्याकरीता गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवून निकषांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केला आहे. ग्रामपंचायत नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत असून सदरचा ऑफलॉईन अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड या कार्यालयात उपलब्ध आहे.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) इच्छुक लाभार्थ्यांनी सदरहू योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील नियम व अटी शर्तीची पुर्तता करुन अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज परीपुर्ण भरुन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालयास सादर करण्यात यावा. राज्यातील गटई कामगारांना १०० टक्के अनुदान या तत्त्वावर पत्र्याचे स्टॉलवर कमाल ५ हजार रुपये इतके डीबीटीद्वारे अनुदान देण्यात येते ही अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील सुशिक्षीत बेरोजगारांसाठी सुवर्ण संधी आहे.

अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे ग्रामीण भागातील ८० हजार व शहरी भागातील १ लाखापेक्षा अधिक नसावे, अथवा अर्जदार दारीद्रय रेषेखालील असावा. अर्जदराचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे. अर्जदार ज्या जागेत स्टॉल मागत असेल ती जागा ग्रामपंचायत, नगरपालिका, छावणी बोर्ड किंवा महानगरपालिका, यांनी त्यास भाड्याने, कराराने खरेदीने, अगर मोफत, परंतु अधिकृतरित्या ताब्यात दिलेली असावी. किंवा ती जागा त्यांच्या स्वमालकीची असावी. सदर योजनेची गटईस्टॉलसाठी जागा उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी गटई कामगाराची राहील. एकदा गटई स्टॉलची वाटप झाल्यानंतर सदर स्टॉलची विक्री करता येणार नाही. तसेच ते भाडे तत्त्वावर देता येणार नाही. तसेच स्टॉलचे हस्तांतरण करता येणार नाही. याबाबत अनियमितता झाल्यास सदर स्टॉल परत घेण्यात येईल. ज्या कारणासाठी गटई स्टॉल देण्यात आलेला आहे. त्या शिवाय इतर कोणत्याही कारणांसाठी वापरता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास स्टॉल रद्द करुन अनुदान वसुल करण्यात येईल. एकदा लाभार्थ्यांना स्टॉलचा लाभ दिल्यानंतर स्टॉलची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांची राहील. स्टॉलचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देता येईल.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार, मोची इत्यादी) घटकांतील सुशिक्षीत बेरोजगार, इच्छुक लाभार्थ्यांकडुन सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत असुन सदरचा ऑफलाईन अर्ज, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सुशिक्षीत बेरोजगार यांनी सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१, मुदखेड येथे गंभीर अनागोंदी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ६ फेब्रूवारी-**

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी१, मुदखेड येथे अधिकारी व कर्मचारी असतानाही दवाखान्यात वेळेवर कर्मचारी व अधिकारी उपस्थिती नसल्याने नागरिक व पशुपालकांची मोठी गैरसोय होत आहे. कार्यालयीन वेळेत दवाखाना बंद असल्याचे चित्र असून जनावरांच्या उपचारांसाठी आलेल्या शेतकऱ्यांना ताटकळत वाट पाहत बसावे लागत आहे.

या दवाखान्यात डॉ. जगताप (मायादम सहायक आयुक्त), डॉ. प्राजक्ता पेंडकर (विस्तार अधिकारी), डॉ. खान (विस्तार अधिकारी)नरवाडे (मायादम पशुधन प्रवेशक) व पिराजी हाटकर (परिचर) असे कर्मचारी कार्यरत असतानाही स्वच्छतेचा अभाव आहे. नेहमी गैरहजर राहून मनमाणी कर्तव्य बजावत आहेत. दवाखान्यातील परिसरात अस्वच्छता असून जनावरांना पिण्यासाठी पाण्याची कोणतीही व्यवस्था केलेली नाही.

गंभीर बाब म्हणजे जनावरांच्या गर्भधारणेसाठी आवश्यक सेवा दवाखान्यात उपलब्ध नसून बीए३ कंठर बाहेर खासगी डॉक्टरांकडे ठेवले जाते. त्यामुळे पशुपालकांना आधी त्या डॉक्टरांच्या घरी जाऊन त्यांना बोलावून दवाखान्यात आणावे लागते, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

या सर्व प्रकाराकडे संबंधित अधिकारी ऊऊ साहेबांनी त्या अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करीत आहेत दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत असून तातडीने दखल घेऊन दवाखान्यात नियमित सेवा, स्वच्छता, पाणीपुरवठा व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पशुपालकांनी केली आहे.

# यंदाचे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

जिल्ह्यातील दक्षिण अंतर्गत माता रमाई विचार मंच, जवळा व माता रमाई जयंती मंडळ, जवळा यांच्या वतीने दिले जाणारे यंदाचे माता रमाई गणगोत पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये पूज्य भंते बौद्धीधम्मो यांची आई आयु. सरस्वतीबाई लक्ष्मणराव पोवळे (वसरणी, नांदेड), ख्यातनाम पत्रकार राजेश्वर कांबळे यांची आई आयु.निर्मलाबाई त्र्यंबक कांबळे (कंधार), आयु.सुनिता नागोराव डोंगरे (उमरी), सुकांता शंकरराव वाघरे, समता सैनिक आयु.दैवशाला गणेश मस्के (माळाकोळी), आयु.लक्ष्मीबाई किशन जमराज (पिंपरण), आयु. जिजाबाई विठ्ठल गोडबोले (बळीरामपूर, नांदेड) मातांचा समावेश आहे.

दरवर्षी त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंती निमित्ताने ७ फेब्रुवारी या दिवसाचं औचित्य साधून ७ मातांचा सन्मान गौरव जवळा ता.लोहा येथील माता रमाई विचारमंच व रमाई जयंती मंडळाच्या वतीने करण्यात येत असतो. कारण त्यागमूर्ती माता रमाईने आपल्या संसारामध्ये अतिशय त्यागमय जीवन जगून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आयुष्यभर साथ दिली. त्याचे प्रतीक म्हणून, त्याग करून मुलं घडविलेल्या मातांना निवड समितीच्या वतीने प्राधान्य देण्यात येत असते. त्यामध्ये भंतेजीची माता, पत्रकारांची माता, सैनिक माता, मुलं घडविलेल्या माता, अशा विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान मातांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, मेडल, शाल, पुष्पहार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येत असतो.

अतिशय आगळावेगळा हा सन्मान सोहळा जवळा (दे) ता.लोहा येथील त्यागमूर्ती माता रमाई जयंती निमित्त दि.७ फेब्रुवारी २०२६ रोजी विश्वशांती बुद्ध विहार, जवळा या ठिकाणी अतिशय थाटामध्ये पार पडणार आहे. अशी माहिती रमाई विचार मंचाचे आयु.आनंद पुरभाजी गोडबोले (भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव, नांदेड तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक नांदेड व जयंती मंडळाच्या अध्यक्षा आयु. भारतबाई विठ्ठल निखाते यांनी दिली.

# गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगमध्ये जेनियाकच्या सोबतीने उद्योजकता कार्यक्रम उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ फेब्रूवारी-**

विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नवकल्पना व आर्थिक साक्षरता विकसित करण्याच्या उद्देशाने गोदावरी कॉलेज ऑफ कॉमर्स, सायन्स अँड टेक्नॉलॉजी, नांदेड यांच्या वतीने ऋएछखउ गोदावरी एंटरप्रेनर्स इन्क्युबेशन ॲण्ड ॲक्सेलरेटर कौन्सिल अंतर्गत 'ऋएछ-छएद (ऋळपरपलश, ऊाशीलश, खर्पीशपींळेपी)' हा प्रेरणादायी कार्यक्रम सोमवारी सहकारसूर्य मुख्यालय, गोदावरी अर्बन, तरोडा नाका येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून नामदार हेमंत पाटील यांनी मार्गदर्शन केले. मराठवाडा अर्थकारणात मागे असून विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील वित्तीय संधी, आर्थिक व्यवहारांची माहिती मिळावी, या हेतूने अशा उपक्रमांची नितांत गरज असून विद्यार्थ्यांनी या ज्ञानाचा भविष्यात निश्चित उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले.

गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगच्या संस्थापक राजश्री पाटील यांनी नोकरी मागणारे हात नव्हे, तर नोकरी देणारे हात घडवायचे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक वृत्ती विकसित झाली पाहिजे, असे स्पष्ट मत व्यक्त केले. कमी वयातच NSE, BSE, NSDL Am{U RBI यांसारख्या नामवंत वित्तीय संस्थांना भेट देण्याची संधी विद्यार्थ्यांना या महाविद्यालयामुळे मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रतिष्ठित व्यापारी राजेंद्र हुरणे यांनी ग्राहकांना गुणवत्ता, नाविन्य, उत्तम सेवा व योग्य दर दिल्यास यश हमखास मिळते. पुढील पिढीने नोकरीऐवजी व्यवसायाकडे वळावे, प्रगतीला मर्यादा नाही, असे सांगितले.

शेतकरी नेते गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी अनुभव हाच खरा गुरु आहे. गुणवत्ता वाढवली तर प्रगती आपोआप होते. आपल्या भागातील गरज ओळखून व्यवसाय केल्यास यशस्वी उद्योजक होता येते, असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी एकूण १० नाविन्यपूर्ण व्यवसाय मॉडेल्स सादर केले. यामध्ये प्युअरपाथ वेलनेस, ब्रू क्रू स्मार्ट कॅफे, गोदावरी फार्मिंग (व्हर्टिकल फार्मिंग), मेल्ट इन मिल्क डेअरी, झिरोकोल बायोफ्युएल प्लांट, रॉयल ३ऊ कस्टमाइझ्ड मेमरीज, वॉटरवेज, ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्ट, ग्रीन इंडिया ट्रॅव्हल, शॉपईज ई-कॉमर्स या प्रकल्पांचा समावेश होता. मान्यवर परीक्षकांनी उत्कृष्ट सादरीकरणाच्या आधारे ग्रीन हायड्रोजन प्रोजेक्टला प्रथम, ग्रीन इंडिया ट्रॅव्हलला द्वितीय, तृतीय क्रमांक विभागून व्हर्टिकल फार्मिंगला आणि प्युअरपाथ वेलनेसला जाहीर केला.

या कार्यक्रमास नामदार हेमंत पाटील, राजश्री पाटील, गुणवंत पाटील हंगरगेकर, राजेंद्र हुरणे, गोदावरी अर्बनचे सचिव अ‍ॅड. रविंद्र रगटे, सीडस अँड पेस्टिसाईडस जिल्हा संघटनेचे अध्यक्ष सदाशिव पुंड, जिन्याकचे मुख्य कार्यकारी अधिकारी मयूर कोकाटे, गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगचे प्रा.नेहा कुर्तडीकर, प्रा.उदयपालसिंह लिखारी, प्रा.प्रताप पाटील, प्रशासकीय अधिकारी वैष्णवी प्रसाद पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती लाभलेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी उद्योजकतेची नवी दिशा देणारा ठरला.

## थोडक्यात...

### ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने स्पेशल एडिशन पॅक सादर केले

**मुंबई –** निन्जांच्या जगात प्रत्येक कृतीला एक असे महत्त्व असते. यामध्ये अचूक वेळेवर केलेला हाताचा संकेत असो किंवा एकाग्रतेचा क्षण वा प्रयत्नांतून साधलेला छोटा विजय असो, अश्या प्रत्येक घटकांमुळे नायकाचा प्रवास निश्र्चित होत असतो. याच संकल्पनेतून प्रेरणा घेत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्सने जागतिक निमे आयकॉन नारुतो साठी सोनी वायएवाय सोबत भागीदारीची घोषणा केली आहे.या भागीदारीअंतर्गत ब्रिटानिया ट्रीट क्रीम वेफर्स यांनी नारुतो विश्र्वावर आधारित विशेष आवृत्तीचे पॅक सादर केले आहेत. त्यामुळे नारुतो फ्रँचायझीसोबत भागीदारी करणारा भारतातील पहिला एफएमसीजी ब्रँड म्हणून ब्रिटानियाची नोंद झाली आहे.

### लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजची धोरणात्मक भागीदार म्हणून नियुक्ती केली आहे

**मुंबई –** भारताच्या सार्वजनिक आरोग्यसेवा पायाभूत सुविधांची पुनर्व्याख्या करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलत, लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडने आज गुवाहाटी मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल (जीएमसीएच) येथे जगातील पहिल्या एआय-आधारित, संपर्करहित रिमोट रुग्ण देखरेख प्रणालीची यशस्वी स्थापना जाहीर केली. ही प्रगत प्रणाली नव्याने उद्घाटन झालेल्या मेडिकल कॉलेज कॉम्प्लेक्सच्या एका स्टेप-डाउन आयसीयू वॉर्डमध्ये स्थापित करण्यात आली आहे.आसामचे माननीय मुख्यमंत्री श्री. हिमंता बिस्वा सरमा यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झालेली ही सुविधा राज्याच्या आरोग्यसेवा प्रवासातील एक महत्त्वाचा क्षण आहे आणि भारतातील एआय-सक्षम क्लिनिकल केअरमध्ये आसामला आघाडीवर ठेवते.

### 'गणेश कार्तिकेय' मालिकेत गिरीजात्मज कथा साकारली जाते

**मुंबई –** सोनी सबवरील पौराणिक गाथा गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय ही मालिका भगवान गणेश (निरण्य समाधिया) यांच्या दिव्य प्रवासाचे चित्रण करते, जिथे ते सिंधुरासुराने निर्माण केलेल्या दोषांना सामोरे जातात. अष्टविनायकातील चिंतामणी अध्याय संपत असताना मत्सराचा नवा दोष उगम पावतो. पवित्र गुहेत भगवान गणेशांचा सामना मत्सरासुराशी (अनवर खान) होतो, जो ईर्षा आणि द्वेषाने प्रेरित आहे. बुद्धी आणि मार्गदर्शनाच्या जोरावर भगवान गणेश दाखवतात की मत्सर फक्त विनाश करतो, तर प्रेम आणि श्रद्धा खरी ताकद निर्माण करतात.

### मुलीसाठी माहेर हे कायमचे घर असल्याचा संदेश

**मुंबई –** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका आपल्या प्रेरणादायी कथानक आणि आपल्याशी नाते सांगणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे प्रेक्षकांची मने जिंकत आहे. मालिकेतील प्रमुख पात्र पुष्पा (करुणा पांडे) हिच्या दैनंदिन संघर्ष आणि विजयांचे सुंदर चित्रण या मालिकेला सर्वाधिक लोकप्रिय कौटुंबिक मनोरंजनांपैकी एक बनवते. अलीकडील एका प्रसंगात पुष्पा आणि तिची मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) यांच्यातील नात्याचे दर्शन घडते, ज्यातून हे अधोरेखित होते की आयुष्य कितीही अस्थिर झाले तरी आईचे घर हे मुलीसाठी सर्वात सुरक्षित आश्रयस्थान असते.

# संभाजीनगर महापालिकेत सत्तेचे चित्र स्पष्ट

## महापौरपदी समीर राजूरकर, उपमहापौरपदी राजेंद्र जंजाळ



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ फेब्रुवारी :** महानगरपालिकेतील सत्तास्थापनेचे चित्र आता स्पष्ट झाले असून महापौरपदी भाजपचे समीर राजूरकर तर उपमहापौरपदी शिवसेना शिंदे गटाकडून राजेंद्र जंजाळ यांची नावे जाहीर झाली आहेत. त्यामुळे महापालिकेतील राजकीय घडामोडींना निर्णायक वळण मिळाले आहे.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाची अधिकृत गटस्थापना आज विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली. जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या नेतृत्वाखाली सर्व नगरसेवकांनी उपस्थित राहून गटस्थापनेची कागदोपत्री प्रक्रिया माननीय विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या समक्ष पूर्ण केली. या बैठकीस महानगरपालिकेतील भाजपचे सर्व ५७ नगरसेवक उपस्थित होते. बैठकीत एकमताने गोविंद केंद्रे यांची भाजप गटनेतेपदी निवड करण्यात आली. महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीच्या पार्श्र्वभूमीवर भाजपकडून प्रदेश नेतृत्वाकडे नावे पाठविण्यात आली होती. त्यानुसार समीर राजूरकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती देण्यात आली.

शिवसेना शिंदे गटाचे समन्वयक विलास पारकर यांनी भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे यांच्या निवासस्थानी घेतलेल्या भेटीनंतर संभाव्य राजकीय समीकरणांना वेग आला होता. आता दोन्ही पक्षांच्या नावांच्या घोषणेमुळे महापालिकेतील सत्तेची दिशा निश्चित झाल्याचे मानले जात आहे.

## कन्नड शहरात सेवा भारतीचे रुग्ण सेवा केंद्र सुरू



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ फेब्रुवारी :** कन्नड शहरात प्रजासत्ताक दिनाच्या शुभ मुहुर्तावर सेवा भारती देवगिरी प्रांताच्या वतीने ३८ वे रुग्ण सेवा केंद्र सुरू करण्यात आले . या सेवा केंद्रांचे उदघाटन साने गुरुजी विद्यालयाचे अध्यक्ष तथा रोटरी क्लब शाखा कन्नड चे अध्यक्ष डॉ. मिलींद पाटील व सिल्लोड जिल्हा संघचालक शेखर मांडे, देवगिरी प्रांत सेवा भारतीचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांतजी शिरपेवार यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी डॉ. मिलींद पाटील यांनी कन्नड शहरात अशा रुग्ण सेवा केंद्राची आवश्यकता आहे. त्यातून गरजूंनी या सेवा केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुर्यकांत शिरपेवार यांनी देवगिरी प्रांत सेवा भारतीच्या विविध उपक्रमाची माहिती विस्तृत स्वरूपात सांगीतली. आपले जीवन फक्त स्वतःसाठी, कुटुंबासाठी नसून समस्त मानव जाती साठी आहे हे न विसरण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित तरुणांना केले.

या प्रसंगी सेवा भारती देवगिरी रूग्णोपयोगी साहित्य केंद्र प्रकल्प प्रमुख शिरीषजी काळे, कार्यालयीन सचिव श्री श्रीधरजी प्रयाग, विजय वाणी ,राजू शर्मा, हरिश महाले, मनोज शर्मा, भाग्यलक्ष्मी शर्मा,कन्नड रुग्ण सेवा केंद्राचे प्रमुख शशिन जाधव, केंद्र सहप्रमुख मयुर राठोड, प्रमोद ढोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्र संचलन प्रमोद ढोले यांनी केलेतर आभार प्रदर्शन मयुर राठोड यांनी केले.

निमुलायझर, ऑक्सीजन कॉन्सट्रेटर, हॉस्पीटल बेड, व्हीलचेअर, वॉकर, एअर बेड, वाटर बेड,सलाईन स्टॅण्ड, कमोड चेअर इत्यादी साहित्य अल्प दरात सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहे. गरजूंनी जरूर लाभ घ्यावा.

## ५० वर्षे, एक राष्ट्र, असंख्य मॅगी 'एकत्रितपणाचे क्षण'

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ फेब्रुवारी :** नेस्ले इंडिया भारतातील मॅगीच्या ५० वर्षांचा उत्सव साजरा करताना एक स्मरणीय पोस्टल स्टँप लॉन्च करताना आनंदित आहे. हा स्टँप श्री मनीष तिवारी, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, नेस्ले इंडिया, आणि श्री चिराग पासवान, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री, भारत सरकार यांच्या हस्ते अनावरण करण्यात आला. हा स्टँप मॅगीच्या उत्क्रांतीला, नेहमीच नवकल्पनांसोबत पुढे राहण्याला आणि एका खूपच आवडत्या श्रेणीशी जोडलेल्या अनुभवांना सन्मान देतो - तसेच पिढ्यांमधून लोकांना एकत्र आणत राहतो, एकमेकांसोबत एकत्रित क्षण साजरे करत राहतो.

## एमजीएममध्ये २१ दिवसीय पालि भाषा कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन अँड फॉरेन लँग्वेजेस आणि केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने पालि भाषा शिक्षणासाठी आयोजित करण्यात आलेली २१ दिवसीय विशेष कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली. कार्यशाळेचा समारोप समारंभ विद्यापीठाच्या आईनस्टाईन सभागृहात पार पडला.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, नव नालंदा महाविहार विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रो.राम नक्षत्र प्रसाद, प्रो. रमेश प्रसाद, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, डॉ. संजय मोहड, साधन व्यक्ती डॉ. जयवंत खंदारे, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंग, प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ही कार्यशाळा १६ जानेवारी ते ५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत घेण्यात आली. पालि भाषा, बुद्धकालीन साहित्य, तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. देशातील विविध राज्यांतून एकूण ४५ विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी या कार्यशाळेत आपला सहभाग नोंदविला.

कार्यशाळेत एकूण १८ कार्य दिवसांत ७४ अध्यापन सत्रांचे आयोजन करण्यात आले. डॉ.प्रफुल्ल गडपाल, डॉ.प्रियांका, डॉ.जयवंत खंदारे, प्रा.रमेश प्रसाद आणि प्रा. रामनक्षत्र प्रसाद या तज्ज्ञ अभ्यासकांनी पालि व्याकरण, साहित्य, भाषांतर कौशल्य तसेच बौद्ध तत्त्वज्ञानावर सखोल मार्गदर्शन केले.

शैक्षणिक उपक्रमांसोबतच सहभागींसाठी अजिंठा व वेरूळ लेणी, घृष्णेश्र्वर मंदिर, गांधेली येथील एमजीएम कृषी विज्ञान केंद्र तसेच एमजीएम विद्यापीठातील विविध विभागांना शैक्षणिक भेटी देण्यात आल्या. ३० जानेवारी रोजी महात्मा गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त शांतता फेरीचे आयोजनही करण्यात आले होते.

कार्यशाळेच्या कालावधीत दोन मौखिक व एक लेखी परीक्षा घेऊन सहभागींचे मूल्यमापन करण्यात आले. समारोप सत्रात मान्यवरांनी पालि भाषेच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रिहाना सय्यद यांनी केले तर आभार डॉ. प्रज्ञा कोनार्डे यांनी मानले.

## 'भिडेवाडा' चित्रपटात प्राजक्ता गायकवाड साकारणार सावित्रीबाई फुले यांची भूमिका

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०६ फेब्रुवारी :** स्त्री शिक्षणाच्या इतिहासातील क्रांतीची साक्षीदार ठरलेला 'भिडेवाडा' आता मराठी रुपेरी पडद्यावर येत असून, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची भूमिका अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड साकारणार आहेत. महात्मा जोतिराव फुले यांच्या भूमिकेत धीरेश जोशी दिसणार आहेत. शिवमुद्रा स्टुडिओज निर्मित व राघो फिल्म प्रस्तुत या चित्रपटाचे दिग्दर्शन शिवानी राजेशिर्के व अजित शिरोळे यांचे आहे. निर्माते जयश्री शिरोळे, कावेरी जावळे असून कथा-पटकथा अजित शिरोळे यांची आहे. इतिहास व वर्तमानाचा सेतू साधणारी ही कथा सामाजिक जाणिवांना चालना देणारा महत्त्वपूर्ण चित्रपट ठरणार आहे.



## फिरोज सरफराज तडवी यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०६ फेब्रुवारी :**

महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी फिरोज सरफराज तडवी केंद्रप्रमुख सोयगाव यांची निवड करण्यात आली आहे.



छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ पदाधिकारी अशोकराव पगारे यांच्या सल्लूयानुसार महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ राज्याध्यक्ष अशोकराव महाले यांनी ही निवड केली आहे.

निवडी बद्दल महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघ राज्याध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व राज्यकार्यकारिणी सदस्य, जिल्ह्यातील केंद्रप्रमुख तसेच जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी,नेते व शिक्षक,पत्रकार यांनी फिरोज तडवी यांचे जिल्हाध्यक्ष निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

## दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप व शालेय स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०६ फेब्रुवारी :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे दहावीची बॅच २०२५- २६ या विद्यार्थ्यांना विद्यालयातर्फे शिक्षक व विद्यार्थी यांचे तर्फे निरोप समारंभ आयोजित करून सस्नेह निरोप देऊन भावी शैक्षणिक वाटचाली साठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच शाळेतील विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण कार्यक्रम यावेळी संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड होते.यावेळी मयुरी महाले,वृषाली गारखेडे या विद्यार्थिनी सह इयत्ता दहावीच्या विद्यार्थी यांनी शाळेतील त्यांच्या शालेय जीवनातील आठवणीवर आधारित भावूक होत मनोगत व्यक्त केले.शाळा व शिक्षक यांच्या बद्दल कृतज्ञ भाव व्यक्त करून आपल्या भावी जीवनात यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षणाचे महत्त्व सांगितले. इयत्ता दहावीची बॅच तर्फे विद्यालयास फोटो फ्रेम भेट देण्यात आली.याप्रसंगी प्रास्ताविकात दौलतसिंग परदेशी यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्य शुभेच्छा देऊन त्यांचे भावी आयुष्य घडवण्यासाठी सकारात्मक ऊर्जा निर्माण करून आपण आपल्या जीवनातील आव्हानांना सामोरे जावे असे सांगितले, कृषीभूषण अरुण सोहनी यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तीच्या जीवनातील शालेय जीवनाचे महत्त्व व जिल्हा परिषद शाळा गुणवत्ता पूर्ण कशा होतील यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले.यानंतर प्रशालेची पदवीधर शिक्षक भास्कर चौधरी यांनी विद्यार्थ्यांना पुढील करिअर निवड साठी बहुमोल मार्गदर्शन केले साईवंशा कॉम्प्युटर चे संचालक बिरारजी गायकवाड व राजेंद्र जावरे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या व त्यांच्यातर्फे सर्व एस.एस.सी. विद्यार्थ्यांना डिजिटल शालेय ओळखपत्र व परीक्षेसाठी उपयोगी साहित्य वाटप केले.यानंतर सहेली ब्युटी स्टुडिओच्या संचालिका शितलताई चौधरी यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेतील यशाबद्दल प्रोत्साहन पर सुंदर अशा ट्रॉफी बक्षीस म्हणून मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आल्या. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्य शुभेच्छा देऊन त्यांच्या एसएससी परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्य. यावेळी वरील मान्यवरांसह प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते संजय शहापूरकर,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शांताराम ढगे,शिक्षक पंकज रगडे पालक सुरेश घन,अंबादास जाधव,सिकंदर तडवी, लोककलावंत विष्णू मापारी,आरोग्य दूत दिगंबर वाघ ,समाधान चौधरी, माजी विद्यार्थी सचिन चौधरी यांचेसह प्रतिष्टीत नागरिक पालक, विद्यार्थी यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्र संचलन दुर्गा वारंगणे हिने केले तर आभार पूनम गायकवाड इयत्ता नऊ वी यांनी मानले

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षक सुकदेव पाटील,दौलतसिंग परदेशी, भास्कर चौधरी,राजेंद्र उंबरकर, विद्याधर बागुल, संगीता सोनवणे, जया वाघ, वैजनाथ सावळे,शिवाजी नवले, निदेशक शिवराम आगे,सचिन ढगे, सीमा राऊत यांनी परिश्रम घेतले.

# नवीन कारभारी येऊनही नगर परिषदेचा सावळागोंधळ सुरूच



**तभा वृत्तसेवा**

**पैठण, दि. ०६ फेब्रुवारी :** अनेक वर्षे प्रशासकीय राज असलेल्या पैठण नगर परिषदेची निवडणूक संपून याठिकाणी कॉन्सील मध्ये नवीन बॉडी येऊन ही नगर परिषदेकडून करण्यात येणाऱ्या कामांचा भोंगळपणा थांबत नसून नाथ हायस्कुल गळ्या समोरील अतिक्रमण केलेल्या ठिकाणी नळकंडी काम थातूर मातुर पद्धतीने उरकण्यात आले परंतु काम करत असतांना याठिकाणी पाण्याची पाईपलाईन फुटल्याने रस्त्यावर पाण्याचा झरा वाहून हजारो लिटर पाणी वाया जात आहे. पाण्याचे प्रेशर जास्त असल्याने बाजारपेठेतील दुकानात हे पाणी शिरत आहे.

मुख्य जलवाहिनीचे काम बिघडल्याने पाणी पाणी करण्याची वेळ ताजी असतांना आता नियोजम शून्य कामामुळे नाथ हायस्कुल समोर काही तशीच परिस्थिती पाहवयास मिळत आहे. शहरात सगळीकडे जागोजागी कचऱ्याचे ढीग दिसत आहेत.त्यातच बुधवारी भल्या पहाटे नाथ हायस्कुल गाळ्या समोरील अतिक्रमणाला अभय देत थेट जलवाहिनी खोदून त्याठिकाणी नळकाड्या आथरण्यात आल्या परिणामी बसस्थानक जवळील बाजारपेठेत पाणीच पाणी झाले आहे. नगराध्यक्षा विद्याताई कावसनकर यांनी याप्रकरणी लक्ष देऊन कार्यवाही करावी अशी मागणी होत आहे.


### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.३०/२०२६

१)मंगलाबाई भगवान बडक, वय ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २) रवींद्र भगवान बडक, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे,

विरुद्ध-निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे यावत,

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भगवान त्र्यंबक बडक यांचा दिनांक २९.१०.२०२४ रोजी मौजे आमखेडा, ता.सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला अजुन त्याच्या पश्यात वरील अर्जदा क्र.१ व २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे मयत भगवान त्र्यंबक बडक यांचे वारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय कामासाठी वारसरप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अंगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदयावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०३.०२.२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्लासह दिले असे.

पु. ता. २३/३/२०२६

**क.लिपीक**
**(दिवाणी व फोजदारी न्यायालय सोयगांव,)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फोजदारी न्यायालय सोयगांव)**

प्रतिलीपी :-

१) नोटीस बोर्ड, दिवाणी च फौजदारी न्यायालय सोयगांव.

२) ग्रामपंचायत कार्यालय आमखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर.

### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए.क्र. ८६ / २०२६

अर्जदार:- १) तान्हाबाई रामनाथ पदार वय ६२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. दहेगाव, जिकठाण, ता. गंगापूर २) मीनाबाई रामनाथ मोरे वय६३ वर्ष, व्यवसाय शेती, रा. पुरी, ता. गंगापूर, ३. एकनाथ रामनाथ चापे वय४७ वर्ष, व्यवसाय शेती, रा. मुरमी, ता. गंगापूर, ४. अशोक रामनाथ चापे वय ५४ वर्ष, व्यवसाय शेती, रा. मुरमी, ता. गंगापूर, ५) भागवत जगन्नाथ चापे वय ६१ वर्ष, व्यवसाय शेती, रा. बहादुरपुरा, ता. छ. संभाजीनगर, जि. छ. संभाजीनगर ६. नंदकुमार जगन्नाथ चापे वय ६२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. आळंदी, ता.खेड, जि. पुणे

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:- कलम २ बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. राधेशाम घनशाम पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकमी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे कि, अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व ३ ते ६ यांचे आजोबा नामे दगडू बाळा चापे हे दि. ०२/०७ / १९६३ रोजी मौजे मुरमी, ता. गंगापूर येथे मृत झाले आहेत.तसेच त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र. १ ते २ यांची आई व अर्जदार क्र. ३ ते ६ यांची आजी नाव अबाबाई दगडूचापे हे देखील त्यानंतर येथे मयत झालेल्या आहेत.असे की, मयत दगडू बाळा चापे यांचे दोन मुले ही होती त्यांची अनुक्रमे मयत नामे १) रामनाथ दगडू चापे हे दि.१०/०८/१९८३ रोजी मौजे मुरमी, ता. गंगापुर येथे मयत झाले. अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील होते. असे की दगडू बाळा चापे यांचा दुसरा मुलगा मयत नामे २) जगन्नाथ दगडू चापे हे दि. ३०/०३/२०२१ रोजी मौजे आळंदी, ता. खेड जि.पुणे येथे मयत झाले असून मयत जगन्नाथ दगडू चापे हे अर्जदार क्र.५ व ६ यांचे वडील आहे. त्यामुळे अर्जदार हे मयत रामनाथ दगडू चापे व जगन्नाथ दगडू चापे तसेच मयत दगडू बाळा चापे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त मयत दगडू बाळा चापे यांना इतर कुणीही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, मयत दगडू बाळा चापे यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा. मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत दगडू बाळा चापे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नगर येणारा आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. करिता सदरील प्रगटन कोर्टाच्या सही शिक्यानिशी दिले आहे.

पुढील तारीख १७/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक.**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम. ए. क्र. ८५ / २०२६

अर्जदार:१).तान्हाबाई रामनाथ पदार वय ६२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. दहेगाव, जिकठाण, ता. गंगापूर २) मीनाबाई रामनाथ मोरे वय ६३ वर्ष, व्यवसाय शेती. रा. पुरी, ता. गंगापूर,३) एकनाथ रामनाथ चापे वय४७ वर्ष, व्यवसाय शेती, रा. मुरमी, ता. गंगापूर, ४) अशोक रामनाथ चापे वय५४ वर्ष, व्यवसाय शेती, रा. मुरमी, ता. गंगापूर, ५) भागवत जगन्नाथ चापे वय ६१ वर्ष व्यवसाय शेती, रा. बहादुरपुरा, ता. छ. संभाजीनगर, जि. छ. संभाजीनगर ६. नंदकुमार जगन्नाथ चापे वय ६२ वर्ष, व्यवसाय शेती, रा. आळंदी, ता. खेड, जि. पुणे

विरुद्ध

गैरअर्जदार:- निरंक

प्रकरण:-कलम २ बॉम्बे रेग्युलेशन कायद्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. राधेशाम घनशाम पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्टनुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकमी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे कि, १. अर्जदार क्र. १ व २ यांचेसखखे चुलते व ३ ते ६ यांचे सख्खे चुलत आजोबा नामे रंभाजी बाळा चापे हे दि. ०३/०५/१९७१ रोजी मौजे मुरमी,ता. गंगापूर येथे मृत झाले आहेत. तसेच त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र. १ ते २ यांची संख्या चुलती व अर्जदार क्र.३ ते ६ यांची संख्या चुलत आजी नाव नानाबाई रंभाजी चापे हे देखील त्यानंतर येथे मृत झालेल्या आहेत. व मयतरंभाजी बाळा चापे व नानाबाई रंभाजी चापे यांना कुठल्याही प्रकारचे अपत्य नव्हते. मयत रंभाजी बाळा चापे व मयतदगडू बाळाचापे हे सख्खे भाऊ होते. यापैकी दगडू बाळा चापे यांना दोन मुले ही होती त्यांची अनुक्रमे नामे मयत १ )रामनाथ दगडू चापे हे दि.१०/०८/१९८३ रोजी मौजे मुरमी, ता. गंगापुर येथे मयत झाले. रामनाथ दगडू चापे हे अर्जदार नं. ३ व ४ यांचे वडील होते. मयत दगडू बाळा चापे यांचा दुसरा मुलगा मयत नामे जगन्नाथ दगडू चापे हे दि. ३०/०३/२०२१ रोजी मौजे आळंदी, ता. खेड जि. पुणे येथे मयत झाले असून मयत जगन्नाथ दगडू चापे हे अर्जदार क्र.५ व ६ यांचे वडील असून अर्जदार नं. ५ व ६ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार हे मयत रामनाथदगडू चापे व जगन्नाथ दगडू चापे तसेच मयत रंभाजी बाळा चापे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांच्याव्यतिरिक्त मयत दगडू बाळा चापे यांना इतर कुणीही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते कि, मयत रंभाजी बाळा चापे यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा. मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत रंभाजी बाळा चापे यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नगर येणाराआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. करिता सदरील प्रगटन कोर्टाच्या सही शिक्यानिशी दिले आहे.

पुढील तारीख १८/०३/२०२६

**कनिष्ठ लिपिक**

**आदेशावरून**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**